गुरूवार, १८ एप्रिल २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २३२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 18 APRIL 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-232 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# रामलल्लाचा 'सूर्यतिलक'



देशभरात बुधवारी रामनवमीचा सण प्रचंड जल्लोषात साजरा करण्यात आला. अयोध्येत राम मंदिराच्या उभारणीनंतर रामलल्लाची ही पहिलीच रामनवमी. त्यामुळे रामलल्लाची विशेष पूजा करण्यात आली. रामलल्लाचा दिव्य राज्याभिषेक झाला. तसेच दुपारी १२ वाजता रामलल्लाचे सूर्य तिलक करण्यात आले. खास तंत्रज्ञानाच्या मदतीने सूर्यकिरणे रामलल्लाच्या कपाळाच्या मधोमध पडल्याचे दिसून आले.

# धुळ्याचे हरीश माळी यांना आधुनिक केसरीचा समाजसेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**आकाश सोनवणे**



धुळे : युवासेनेचे धुळे जिल्हाप्रमुख, धुळे जिल्हा माळी समाज युवक संघटना अध्यक्ष, आईसाहेब सामाजिक सांस्कृतिक संस्थेचे सचिव तसेच 6 वेळा कुस्तीत नॅशनल चॅम्पियन राहिलेले हरीश गंगाधर माळी यांना दैनिक आधुनिक केसरीचा समाजसेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.


हरीश गंगाधर माळी यांनी हिंदुह्यसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रभावित होऊन गेल्या 13 वर्षांपासून शिवसेनेत सक्रिय सहभाग तसेच 7 वर्षांपासून युवासेनेत पाहिले 6 वर्ष देवपूर शहर अधिकारी, धुळे शहर उपजिल्हाधिकारी म्हणून जबाबदारी पार पडली. तसेच त्यांच्या कार्याची दखल घेत आता त्यांना युवासेनेच्या धुळे जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी सोपवण्यात आली व ती यशस्वीरित्या पार पाडत आहेत.

देवपूर शहर हे धुळे जिल्ह्यातील शिक्षणाचे माहेरघर असून येथेच सर्व नामवंत महाविद्यालये आहेत. देवपूर युवासेना अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडत असताना हरीश माळी हे विद्यार्थ्यांच्या समस्या व अडचणी यशस्वीरित्या सोडवण्याचा प्रयत्न करत आले आहेत.

तसेच महाविद्यालयीन निवडणुकांमध्ये आतापर्यंत सर्वात जास्त वेळा युवासेनेचा भगवा झेंडा फडकवण्यात यश मिळवले आहे. युवासेनेच्या माध्यमातून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात विद्यार्थ्यांचे CARRYON, ANY FIVE असे अनेक जटिल प्रश्न आंदोलनाच्या माध्यमातून त्यांनी यशस्वीपणे सोडवले. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे उपविभागीय कार्यालय धुळ्यात व्हावे यासाठी करण्यात आलेल्या आंदोलनात प्रशासनाचा पुतळा जाळत असताना 1 दिवसासाठी त्यांना जेलमध्ये जावे लागले.

कृषी विद्यापीठ हे धुळ्यात व्हावे म्हणून गेल्या 5 वर्षांपासून सतत युवासेनेच्या माध्यमामातून आंदोलन करण्यात येत असून रस्ता रोको व इतर मार्गांनी ते अजूनही लढा देत आहेत.

आरोग्य क्षेत्रात सेवा करत असताना युवासेना देवपूर धुळेच्या माध्यमातून सातत्याने 8 वर्षांपासून स्वातंत्र्यदिनी 15 ऑगस्टला महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. सरासरी दरवर्षी 500 ते 600 रक्तदाते रक्तदान करीत असतात. ही रक्तदान शिबिरे रक्तसंकलनाच्या बाबतीत धुळे जिल्ह्यात सर्वोत्कृष्ट, ऐतिहासिक असतात. तसेच हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेबांच्या शिकवणीप्रमाणे रुग्णसेवा 12 ही महिने 24 तास करीत आहेत. त्यात गोरगरीब जनतेस विनामूल्य अथवा अल्पदरात रक्त वेळेवर उपलब्ध करून देण्यापासून त्यांच्या मदतीस शासकीय किंवा खासगी रुग्णालयात मदत करत आहेत. हरीश माळी हे कोरोना महामारीत रात्री अपरात्री गरजवंतांच्या मदतीला धावून गेले आहेत. शिवसेना व युवासेना संघटनेच्या माध्यमातून अनेक रुग्णांना वेळेवर हॉस्पिटलमध्ये बेड, ऑक्सिजन, रेमेडीसिव्हर इंजेक्शने तसेच औषधे उपलब्ध करून दिली आहेत.



कोरोना काळात युवासेनेच्या माध्यमातून मास्क, सॅनिटायझर व इतर अत्यावश्यक वस्तूंचे मोफत वाटप केले. कोरोना काळात गरीब व गरजवंतांना मोफत धान्य, कपडे, शिधावाटप केले. सांस्कृतिक कार्यक्रम करत असताना विद्यार्थी व महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी करिअर मार्गदर्शन शिबिरे, रांगोळी स्पर्धा, सायकलिंग स्पर्धा, तिथीनुसार शिवजयंती मिरवणूक उत्सव तसेच सार्वजनिक गणपती उत्सव, हनुमान जयंती उत्सव व त्यात अनेक कार्यक्रमांचे आयोजन सातत्याने करत असतात.

हरीश माळी यांचा परिवार गेल्या 60 वर्षांपासून राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, सहकार, शैक्षणिक क्षेत्रात सतत कार्यरत आहे. त्यामुळे शालेय जीवनापासून समाजसेवा करण्यासाठी संघटनात्मक कार्य केले आहे. त्यात सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्र उत्सव, तिथीनुसार शिवजयंती, हनुमान जयंती उत्सव, विद्यार्थी गुणगौरव व मार्गदर्शन शिबिरे तसेच स्वतः कुस्ती क्षेत्रात असल्यामुळे तरुणांना कुस्ती तसेच इतर खेळांविषयीची आवड व सहभाग वाढवण्यासाठी आजपर्यंत सातत्याने कार्य सुरू आहे. तसेच धार्मिक क्षेत्रातील आध्यात्मिक वारसा जपत असताना अनेक नामवंत धार्मिक कथाकार, कीर्तनकार यांचे वर्षातून अनेक साप्ताहिके, कथा, कीर्तने आयोजित करत आहेत.


सामाजिक क्षेत्रात काम करत असताना आजोबा, वडील, मोठे बंधू यांच्या पावलावर पाऊल टाकत माळी समाज युवक जिल्हा अध्यक्ष म्हणून अविरत काम करत आहेत. धुळ्याच्या एकूण लोकसंख्येच्या 40 टक्के लोकसंख्या ही माळी समाजाची असल्याने अनेक ठिकाणी 80 ते 90 ग्रामीण भागात, पाड्यात जाऊन समाजहिताची कामे हरीश माळी करत असतात. सर्व सामाजिक उपक्रमात हरीश माळी यांचा पुढाकार असतो. त्यांचे हे कार्य निश्चितच इतरांसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या या वेगळ्या वाटेवरील प्रवासाबद्दल आधुनिक केसरीने त्यांना समाजसेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार घोषित केलेला आहे. लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या सन्मान सोहळ्यात त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्काराबद्दल समाजातील विविध स्तरातून हरीश माळी यांचे अभिनंदन होत आहे.

# आता छुपा प्रचार सुरू

## विदर्भातील पाच लोकसभांमध्ये प्रचाराच्या तोफा थंडावल्या

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर : विदर्भातील पाच लोकसभा मतदारसंघातील प्रचारतोफा थंडावल्या आहेत. राज्यातील पहिल्या टप्प्यासाठी येत्या 19 एप्रिल रोजी मतदान होणार असून नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, रामटेक आणि भंडारा गोंदिया या मतदारसंघांमध्ये प्रचाराच्या तोफा थंडावल्या असून आता छुपा प्रचार सुरू झाला आहे.**





विदर्भातील पाच लोकसभा मतदारसंघात 19 एप्रिल 2024 ला पहिल्या टप्प्यासाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. 17 एप्रिल ला भंडारा-गोंदिया लोकसभेतील अर्जुनी मोरगाव विधानसभा आणि गडचिरोली-चिमूर लोकसभेतील देवरी-आमगाव विधानसभा क्षेत्रात दुपारी तीन वाजता प्रचारतोफा थंडावल्या आहेत. तर गोंदिया आणि तिरोडा या दोन विधानसभा क्षेत्रामध्ये सायंकाळी 6 वाजता प्रचारतोफा थंडावल्या. 19 एप्रिलला होणाऱ्या निवडणुकीसाठी मागील 17 दिवसांपासून प्रचार सुरू होता. या प्रचाराच्या तोफा आज सायंकाळी सहा वाजता थंडावल्यात. महाविकास आघाडीच्या वतीने प्रशांत पडोळे तर महायुतीच्या वतीने सुनील मेंढे हे एकमेकांसमोर उभे आहेत. या दोन्ही उमेदवारांसह सर्वच उमेदवारांनी आज शेवटच्या दिवशी मोठं शक्तीप्रदर्शन करीत रॅली काढल्या. त्यानंतर त्यांच्या प्रचारतोफा 6 वाजता थंडावल्या असून आता उमेदवाराकडून भेटीगाठी वर भर दिला जात आहे.

**मतदारांचा नेमका कौल कोणाला?** चंद्रपूर लोकसभा मतदार संघात भाजपाचे मातब्बर नेते सुधीर मुनगंटीवार व काँग्रेसच्या प्रतिभाताई धानोरकर यांच्यात अटीतटीचा सामना रंगला आहे . प्रतिभाताई धानोरकर यांना सहानुभुतीची लाट तारेल की सुधीर मुनगंटीवार यांना मोदींची लाट तारेल हे निवडणुक निकालानंतरच स्पष्ट होईल . नागपूर लोकसभा मतदारसंघात भाजपचे हेवीवेट नेते आणि महायुतीचे उमेदवार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि काँग्रेस नेते आमदार विकास ठाकरे यांच्यात चांगलाच सामना रंगतोय . सुरुवातीला एकतर्फी वाटणारी ही निवडणूक आता बऱ्यापैकी अटीतटीवर येऊन रंगातदार ठरलीय . या दोन्ही नेत्यांनी आपली संपूर्ण ताकद पणाला लावली आहे . दोन्ही नेते तहान–भूक विसरून मिळेले त्या संधीचे सोने करत आपल्या प्रचाराला लागले आहेत .


# विदर्भातील पाचही जागांवर विजय पक्का: नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचाराच्या शेवटच्या दिवशीही काँग्रेस नेत्यांनी प्रचाराचा धडाका लावला. लोकसभेची निवडणूक जनतेने हातात घेतली असून काँग्रेस व इंडिया आघाडीच्या उमेदवारांना जनतेचा आशिर्वाद मिळाला आहे. विरोधी पक्षांच्या उमेदवाराला लोकांनी अनेक गावातून हाकलून लावले. १० वर्षातील अत्याचारी कारभाराला जनता कंटाळली आहे. मोदी सरकारविरोधात जनतेमध्ये तीव्र संताप असून विदर्भातील पाचही जागांवर इंडिया आघाडीच्या उमेदवारांचा विजय होईल, असा विश्वास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केला आहे.

भंडाऱ्यात पत्रकारांशी संवाद साधताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, केंद्रातील तानाशाही सरकारने १० वर्षात देशाची संपत्ती विकून देश चालवला, देश कर्जबाजारी करून ठेवला, तरुणांचे जीवन बरबाद केले, शेतकऱ्यांना उद्धवस्त केले, महागाई, बेरोजगारी या ज्वलंत विषयावर भाजपाचे नेते बोलतच नाहीत, हा राग जनतेच्या मनात आहे. मोदी सरकारचा कारभार पाहून जनतेने त्यांचा निर्णय पक्का केला असून परिवर्तन होणार असे चित्र विदर्भातील पाचही मतदारसंघात दिसले. काँग्रेस पक्षाने जाहीर सभा, चौक सभा घेण्याबरोबरच घरोघरी जाऊन ५ न्याय व २५ गॅरंटीची माहिती लोकांपर्यंत पोहचवली. काँग्रेस पक्षाने दिलेली गॅरंटी जनतेचे कल्याण करणारी आहे तर मोदी गॅरंटी ही भ्रष्टाचारी लोकांना वाचवणारी आहे. भ्रष्ट लोकांना ईडी, सीबीआयकडून दबाव आणून भाजपात प्रवेश द्यायचा व वॉशिंगमधून त्यांना स्वच्छ करण्याचे काम भाजपाने केले आहे.

# उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


## मंगल भवन अमंगल हारी


आधुनिक केसरी



सध्या रामनवमीची धामधूम सुरू आहे. गावागावातील राममंदिरे सुंदर रोषणाईने सजली आहेत. रामभक्तीची धून सर्वत्र ऐकू येते आहे. वातावरणात एक अनोखे चैतन्य भरून राहिले आहे. जशी विठ्ठल भक्तांना आषाढी एकादशीची ओढ लागलेली असते, तशीच रामनवमीची वाट रामभक्त पाहत असतात. चैत्र शु. नवमीला रामभक्तांचे मनोरथ पूर्ण होतात. चैत्र महिना रामभक्तांचा आनंद द्विगुणित करतो. रामभक्तांना रामाइतकेच प्रिय, वंदनीय आणि प्रातःस्मरणीय अशा हनुमंताची जयंती देखील लवकरच म्हणजे चैत्र शुद्ध पौर्णिमेला येते. आबालवृद्ध दर्शनासाठी मंदिरांमध्ये गर्दी करतात. रामाचं आणि हनुमंताचं दर्शन घेऊन धन्य होतात. अयोध्येत तर रामलल्लाच्या दर्शनासाठी भक्तांची मांदियाळी जमतेच आहे. मंगल भवन अमंगल हारी या तुलसीदासांच्या चौपाईत म्हटल्याप्रमाणे श्रीराम हे मंगलाचे धाम आहेत, मंगल करणारे आहेत आणि अमंगल हरण करणारे आहेत. त्यांची म्हणजेच या दशरथनंदनाची कृपा आपल्यावर सदैव राहो. पण रामाची प्रार्थना का करायची ? रामनाम हे श्रेष्ठ का आहे ? रामाचं मोठेपण कशात आहे या प्रश्नांची उत्तरं या लेखात शोधण्याचा प्रयत्न आपण करू या. आपल्या सगळ्यांना हे माहिती आहे की रामाने अनीतीने वागणाऱ्या, दुराचारी, अन्यायी आणि अत्याचारी अशा रावणाचा वध केला. दुष्ट अशा वालीचा वध केला. न्याय आणि नीतीचे राज्य स्थापन केले. रामराज्य तर भारतीय संस्कृतीचा सुवर्णकाळ होता असे म्हटले जाते. पण तत्कालीन ऋषीमुनींच्या मते रामाची थोरवी त्याने रावणाला मारले यात नाहीच मुळी ! वाचून नक्कीच आश्चर्य वाटलं असेल पण तशीच ही गोष्ट आहे.

## हितगुज





पुष्प ४२वे

गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

### ज्ञानियांचा राजा

ज्ञानेश्वर तर तथाकथित तज्ज्ञांनी बहिष्कृत केलेला व धिक्कारलेला होता. काहींचे अपवाद वगळता ते कशाला या बालकाचे प्रवचन ऐकायला येतील? अशा परिस्थितीत संत ज्ञानेश्वरांचा शब्द न शब्द श्रोते ऐकत होते. मनी साठवत होते. जगण्याशी ते जोडण्याचा सूज्ञपणा करीत होते. उत्तम वक्तव्याला, सरस, सुंदर बोलण्याची वाहवा करून वक्त्याला आनंद देत होते. त्यांची रसिक दाद मिळून संत ज्ञानेश्वरांचे सहज बोलणे अधिक खुलायचे, रंगायचे, आत्मभान विसरून हा वाग्यज्ञ तेथे सर्व अनुभवत होते. अडाणी, ग्रामीण मानलेल्या त्या जनसमूहाची संवेदनशीलता, आकलन शक्ती जबर, जिवंत व सखोल होती. संत ज्ञानेश्वर जे सांगत होते, ते जाणून घेण्याची क्षमता त्यांच्यात होती. त्यांचे जीवन, लोकव्यवहार, संस्कृती या विषयीच्या जाणीवा, निरीक्षण चौफेर होते. त्यांच्या संकल्पना, विश्वास, श्रद्धा पक्की होती. त्यांना संत ज्ञानेश्वरांच्या शब्दांचे मोल, महत्त्व कळलेले होते. त्या शब्दांचे मर्म जाणण्याची त्यांची वैचारिक प्रगल्भता होती. आज आपल्याला काय आढळते? भरपूर अंक परीक्षेत मिळवणार्या बालक, युवकांना ज्ञानेश्वरीच्या काही ओव्या पाठ्यपुस्तकात असल्या तरी कठीण वाटतात. संत काव्य त्यांना नीरस, कंटाळवाणे वाटते. अभ्यासक्रमातून ते वगळून अभ्यास करण्याच्या क्लृप्त्या शोधतात किंवा बाजारात मिळणार्या मार्गदर्शकांच्या माध्यमातून ते प्रश्न सोडवतात. जीवनाला पूरक, पोषक, वास्तवदर्शी, विचारस्पर्शी, हृदस्पर्शी साहित्य त्यांना आकर्षित करीत नाही. पाठांतराने परीक्षा उत्तम तर्हेने पास करणार्या या पिढीत सृजनशीलता, संवेदनशीलता, वैचारिकता खूप बोथट झाल्याची दिसते. अशा पिढ्यांनी बनलेल्या समाजात कोणत्याही दृष्कृत्यांनी मने पेटून उठत नाहीत, अराजकतेने मनावर ओरखडे उमटत नाहीत. अन्याय पाहून मने क्षुब्ध होत नाहीत.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

## आनंदी पहाट



### जागरूकता जागृत असल्याचे लक्षण

आधुनिक केसरी

माइंडफुलनेसची सुरुवात वैयक्तिक सराव म्हणून होत असली तरी, जेव्हा सजगता समूह सदस्यांमध्ये सामायिक केली जाते, तेव्हा समुदायाची भरभराट होण्याची अधिक शक्यता असते. जेव्हा त्यांचा वैयक्तिक अजेंडा आणि हेतू सामूहिक उद्दिष्टांशी संरेखित नसतात तेव्हा व्यक्ती जागरूक होतात. जागरुकतेमुळे, व्यक्ती संलग्नक, संरक्षण आणि निर्णय काढून टाकण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या विश्वासांना आव्हान देऊ शकतात. जेव्हा आपण सजग असतो, तेव्हा आपण आपल्या परस्परसंवादात वस्तुनिष्ठ, निर्णय न घेणारा, अ-संरक्षणात्मक आणि अहिंसक असण्याची अधिक शक्यता असते. या भूमिकेद्वारे, आपण इतरांशी अधिक चांगल्या प्रकारे कनेक्ट होऊ शकतो. त्या कनेक्शनद्वारे, अडचणी दूर केल्या जातात, समुदाय तयार होतो, मजबूत होतो, समाजातील सदस्यांमध्ये विश्वास वाढतो. माइंडफुल हा शब्द आजच्या लोकप्रिय संस्कृतीत वारंवार वापरला जातो. आपण असे म्हणतो की आपण सजग ध्यानाचा सराव करतो, किंवा आपण आपल्या कृतींमध्ये सजग आहोत, किंवा आपल्याला कसे समजले जाते, याची जाणीव आहे. पण सजग राहणे किंवा माइंडफुलनेसचा सराव करणे म्हणजे नेमके काय? ते आपल्यासाठी महत्त्वाचे का आहे? ते महत्त्वाचे आहे हे आम्ही मान्य करत असल्यास, आम्ही ते वापरून समुदाय तयार करण्यात कशी मदत करू शकतो? आणि आपण ते स्वतःसाठी कसे विकसित करू शकतो? मुळात माइंडफुलनेस म्हणजे विलक्षण क्षणात जगणे होय. आमचे निर्णय आणि गृहितके आमचे शब्द आणि कृती गोंधळात टाकण्याऐवजी, आम्ही सौम्य, प्रेमळ, दयाळू मार्गांनी प्रतिसाद देतो. असे केल्याने, आम्ही चांगले नातेसंबंध निर्माण करतो. इतरांवर प्रभाव टाकण्यासाठी आणि सशक्त समुदाय तयार करण्यासाठी, व्यक्ती म्हणून, सजगतेची सुरुवात आपल्यापासून झाली पाहिजे. माइंडफुलनेस आपल्या शरीर, मन, आत्मा आणि भावनांद्वारे व्यक्त केले जाते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### सगुण निर्गुण | तुचि एक ||

विठ्ठला तुझा रे | गवसला ठाव ||
चित्ती माझा भाव | वास तेथे ||१||
मनाच्या गाभारी | आत्म्याचे चिंतन ||
नामसंकीर्तन | तुझे चाले ||२||
ज्ञाना तुका ठायी | एक तुझे रूप ||
पाहतो स्वरूप | चराचरी ||३||
यज्ञ कर्म चाले | नित्य अभंगात ||
तोचि खरा संत | जाण जीवा ||४||
आता न उरले | मी तू हे बंधन ||
सगुण निर्गुण | तुचि एक ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सृष्टि चक्र देखत रहे, आप चक्र में नाहिं ।
धिर प्रबुद्ध यह आतमा, दुर्लभ है जग माहिं ।।६९।।(स्वर्वेद प्रथम मण्डल प्रथम अध्याय) ०१/०१/६९

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : जीवन्मुक्त ज्ञानवान योगी आपल्या, योगाच्या शुद्ध भूमीवर राहून संसारातील सर्व कार्ये करतात आणि आपल्या ज्ञानयुक्त योग कलेने त्या कार्यांपासून असंग, जल कमलवत् पृथक रहातात. संसार चक्राचे अवलोकन करीत स्वतः साक्षी मात्र होऊन त्यापासून अलग असतात. असे जीवन्मुक्त असंग योगी जगापासून निर्लेप होऊन परमानंदाचा उपभोग करतात. जगात असे जीवन्मुक्त योगी अत्यंत दुर्लभ आहेत, अर्थात अशा महान पदास कोणी विशेष पुण्य प्रतापवान योगयुक्त पुरुषार्थी योगीच प्राप्त करतो. या पदात जीवन्मुक्त योग्याचे लक्षण सांगितले आहे.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## नाम घेतल्याने आपले अवगुण कळून येतील

आधुनिक केसरी



जगातली अनेक साधने जरी पाहिली तरी त्या सर्व साधनांची पहिली पायरी ही, की मनुष्याला त्याचे अवगुण दिसू लागणे. जसजसे साधन वाढत जाईल तसतसे आपल्यातले अवगुण प्रखररूपाने दिसू लागतात, आणि त्या अवगुणांचा पुढे डोंगरच वाटू लागतो, "हे परमेश्वरा ! इतक्या अवगुणांनी मी भरलेला असताना, तुझे दर्शन व्हावे अशी मी कशी अपेक्षा करू ? एवढ्या पर्वतप्राय अवगुणांच्या राशीतून मला तुझे दर्शन होईल हे कालयत्री तरी शक्य आहे का ?" असे वाटू लागते. साधन करण्यापूर्वी, रागीट माणूस कधी त्या रागाची खंत बाळगत नाही; किंबहुना, तो अवगुण आहे हे मुळी त्याला पटतच नाही. तो म्हणतो, "व्यवहारात असा दरारा पाहिजेच; त्याशिवाय कसे चालेल ?" एक साधक मला म्हणाला की, "अलीकडे मला फार राग येऊ लागला आहे." वास्तविक, तो राग आताच येऊ लागला असे नसून पूर्वीपासूनच त्याच्याजवळ होता, परंतु साधन करू लागल्यापासून त्याला जाणीव होऊ लागली आहे, किंवा क्रोध वाईट आहे हे आता त्याला कळू लागले आहे, इतकेच ! एक लग्नाचा मुलगा होता. त्याने बऱ्याच मुली पाहिल्या, पण एकही त्याच्या मनास येईना. त्याचे आईवडील कंटाळून त्याला म्हणाले, "तुला मुलगी पसंत पडू दे, मग आम्ही पुढचे काय ते ठरवू." ते काही मुलगी पाहायला बरोबर जात नसत. त्या मुलाची मोठी बहीण होती तीच त्याच्याबरोबर जात असे. एका ठिकाणाहून मुलगी पाहून आल्यावर मोठ्या बहिणीने त्याला विचारले, "कशी वाटली रे तुला ?" त्यावर तो म्हणाल, "नाही बुवा आपल्याला पसंत." मोठी बहीण चाणाक्ष होती; तिने फक्त त्याच्या तोंडासमोर आरसा धरला आणि विचारले, "या प्रतिबिंबापुढे कशी काय वाटते ?" तेव्हा स्वतःचे आणि मुलीचे रूप त्याच्या ध्यानी आले, आणि तो म्हणाला, "पुष्कळ बरी आहे." सारांश, जिथपर्यंत आपल्याला स्वतःचे खरे दर्शन होऊ शकत नाही, तिथपर्यंत दुसऱ्यांचे अवगुणच आपल्याला दिसतात. आपल्याला दुसऱ्याचे जे काही अवगुण दिसतात, त्यांचे बीज आपल्यातच आहे, हे माणसाने ठाम ओळखले पाहिजे. तेव्हा, दुसऱ्याचे अवगुण पाहण्याची वृत्ती आपण प्रथम टाकून दिली पाहिजे. दुसऱ्याचे अवगुण पाहणे हा साधा नेहमीचा व्यवहार आहे, तो परमार्थ नव्हे. खरा परमार्थी जो असतो तो सतत आत्मपरीक्षण करीत असतो. त्याला दुसऱ्याचे अवगुण दिसतच नाहीत; त्याला आपल्याच अवगुणांचे इतके दर्शन होते की, त्या मानाने इतर सर्वजण त्याला परमेश्वररूपच भासतात; आणि हाच खरा परमार्थ.

## गुणरूपनिरसन

आधुनिक केसरी

अचेतन वस्तूमध्ये जाणीव सुप्त अवस्थेत असते. सचेतन वस्तूमध्ये जाणीवांचा जिवंतपणा आपल्याला आढळून येतो. समर्थांचे विश्व मनाचे विचार या समासात पहायला मिळतात. साधनेने साधकांची जाणीव देहाच्या बाहेर पसरते. ती अतिसूक्ष्म बनत जाते.आणि सर्व जीवांच्या जाणिवेशीं समरस होऊ शकते. महान आत्मा होण्यासाठी संताचें हे विचार आपल्याला मार्गदर्शक ठरतात. साधना,नाम, जीवनानुभव या त्रिसूत्री वर समर्थांची शिकवण आपण कायम लक्षात ठेवावी. हे या निमित्ताने अभ्यासता आले. या समासात आपणास आतापर्यंत समर्थांनी वेदांदृष्टया आणि साधन दृष्ट्या एक फार मौल्यवान गोष्ट सांगितली आहे की सचेतन व अचेतन गोष्टी या संपूर्ण चराचरात व्यापून आहेत. मित्रांनो आपण लहानपणापासून झाडे, फळफळावळ, अन्नपदार्थ,नदीनाले डोंगर, वनस्पती,फुले दगडगोटे, समुद्र ,आकाश तारे नभांगण आणि चराचरात व्यापून राहिलेले असंख्य जीव हे पहातचं लहानाचे मोठे झालो.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरूवार, १८ एप्रिल २०२४
adhunikkesari.com

# उमद्या पत्रकाराला माजलगावकर मुकले : वसंत मुंडे

## अपघाती मृत्यू झालेल्या सचिन नाईक यांच्या कुटुंबीयांना पत्रकार संघाचा मदतीचा हात

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** येथील तरूण पत्रकार सचिन नाईक यांच्या अपघाती निधनामुळे माजलगावकर उमद्या पत्रकाराला मुकले आहेत, अशा शब्दांत महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी आपल्या शोक भावना व्यक्त केल्या.

बुधवार, १७ एप्रिल रोजी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी नाईक यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने नाईक यांच्या कुटुंबियांना त्यांचे वडील व बंधू यांच्याकडे अर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली. माजलगाव येथील तरूण पत्रकार सचिन नाईक यांचे काही दिवसांपूर्वी अपघाती निधन झाले. सचिन नाईक हा कुटुंबातील कर्ता होता. त्यांच्यावर कुटुंबाची जबाबदारी होती. आई - वडील वयोवृद्ध आहेत. नाईक कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ सहभागी आहे. मदतीचा हात म्हणून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघातर्फे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या पुढाकारातून मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी, राज्य कार्यकारिणी सदस्य बाबा देशमाने, प्रा. सुदर्शन स्वामी, परमेश्वर सोळंके, किसन भदर्गे, रविकांत उघडे,संतोष जेथलिया यांनी सांत्वनपर भेट घेत आर्थिक मदत केली.





# यंग चांदा ब्रिगेडच्या मेळाव्यात चंद्रपूरच्या विकासाची मुनगंटीवार यांनी घेतली गॅरंटी

## 'अब की बार सुधीरभाऊ खासदार' आ. किशोर जोरगेवारांनी केली दमदार घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आमदार किशोर जोरगेवार यांच्या नेतृत्वातील यंग चांदा ब्रिगेड समर्थन व पाठिंबा देत माझ्यासोबत आली आहे. हा विचारांचा संगम आहे. याचा मला आनंद आहे, असे प्रतिपादन चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई (आठवले गट), पीपल्स रिपब्लिकन पार्टी (कवाडे गट), रासप मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

यंग चांदा ब्रिगेड तर्फे शकुंतला लॉन, नागपूर रोड, चंद्रपूर येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. मंचावर चंद्रपूरचे आमदार कशिोर जोरगेवार, त्यांच्या पत्नी कल्याणी जोरगेवार, शिवसेनेचे चंद्रपूर जिल्हा संपर्कप्रमुख कशिोर राय, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन मते व बंडू हजारे, प्रकाश देवतळे, नामदेव डाहुले, प्रतिमा ठाकूर, भरत गुप्ता, यंग चांदा ब्रिगेडच्या महिला प्रमुख वंदना हातगावकर, सविता दंडारे, सायली येरणे, सरोज चांदेकर, अजय जयस्वाल यांच्यासह भाजपा महायुती तसेच, यंग चांदा ब्रिगेडचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

रामनवमी निमित्त सर्वांना ना. सुधीर मुनगंटीवार यांनी शुभेच्छा दिल्या. ते पुढे म्हणाले, देशामध्ये सध्या विश्वगौरव मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांचा 'टॉवर' कार्यरत असून त्यात चुकून काँग्रेसचे सीम टाकल्यास नेटवर्क मळिणार नाही. विक सिग्नलमुळे संवाद होणार नाही. त्यामुळे योग्य मोबाईल मध्ये योग्य ते सीम टाका, असा सल्ला त्यांनी दिला.

ही निवडणूक देशाच्या प्रगतीची कुणबी समाजाचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत असून यंदा 'ना जात पर, ना पात पर राजनिती होगी विकास पर', हे लक्षात ठेवा. प्रतिस्पर्धी उमेदवार विकासावर चर्चा करत नसून सोशल मिडीयावर निच प्रचार करत आहे. जे लोक चुकीचे काम करत आहेत, त्यांचा निश्चितपणे पराभव होईल.देशात मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांनी सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, आध्यात्मिक क्षेत्रात प्रगती मोदींजीनी केली आहे. लोकसभेची ही लढाई कोणा एका व्यक्तीची, त्याच्या मोठेपणाची नसून ही देशाच्या, तिरंग्याच्या सन्मानाची आहे असे ना. मुनगंटीवार म्हणाले.

मुनगंटीवार हे माझे गुरू आहेत, असा उल्लेख करून आ. कशिोर जोरगेवार म्हणाले, सध्या संपूर्ण देशाचे लक्ष मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांच्याकडे तर महाराष्ट्राचे लक्ष ना. सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे लागले आहे. ना. मुनगंटीवार हे एक लाखापेक्षा अधिक मतांनी निवडून येत लोकसभेत जातील, असा मला विश्वास आहे. चंद्रपूरमध्ये विकासाची खूप ताकद असून ही ताकद जगाला दाखवण्याची ही उत्तम संधी आहे. ना. मुनगंटीवार हे केवळ चंद्रपूरचे नाही तर राज्याच्या विकासाचे 'ब्लूप्रिंट' आहेत, असे आ. जोरगेवार म्हणाले.

चंद्रपूर जिल्हा हा शासन दरबारी ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या नावाने ओळखला जातो. त्यांनी या जिल्हयाचा समग्र विकास केला. शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवल्या. अफाट शक्ती, नियोजनबद्ध व प्रत्येक विषयावर सखोल अभ्यास करून आकडेवारीसह विश्लेषण करणारे ना. मुनगंटीवार यांची विकासाची दृष्टी विस्तीर्ण असून त्यांना लोकसभेत पाठवल्यास केंद्राच्या विकासाच्या योजनादेखील ते चंद्रपूरपर्यंत आणतील, याची मी 'गॅरंटी' देतो, असे म्हणत यंग चांदा ब्रिगेडचे सरसेनापती व चंद्रपूरचे आ. कशिोर जोरगेवार यांनी 'अब की बार सुधीरभाऊ खासदार' अशी दमदार घोषणा केली.

# लाट परिवर्तनाची ! नीलेश लंके यांचा विजय पक्का! विखे पाटलांची सरंजामशाही संपणार

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**अहिल्यानगर :** बहुतेक सर्व वाहिन्या आणि संस्थांच्या सर्वेमध्ये नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके निवडणूक जिंकतील अशी शक्यता वर्तवली जात आहे. हे एकप्रकारचे सुचिन्ह असून नगर दक्षिण मतदारसंघाला विखे पाटील घराण्याच्या सरंजामशाहीतून मुक्ती मिळेल अशी आशा सर्वसामान्य नागरीक व्यक्त करीत आहेत.



महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांनी एक एप्रिलपासून मतदारसंघात नगर दक्षिण स्वाभिमान यात्रा सुरू केली असून या माध्यमातून ते मतदारांशी संवाद साधत आहेत. त्यांच्या यात्रेला भरघोस प्रतिसाद मिळत आहे. अगदी विरोधी गटातील अनेक मातब्बर मंडळींनी तुतारी हाती घेऊन लंके यांचे हात बळकट केले आहेत. वृत्तवाहिन्यांच्या सर्वेनुसार अहमदनगर लोकसभा मतदारसंघात निलेश लंके सुजय विखे यांचा पराभव करतील अशी शक्यता वर्तवली आहे. गेली अनेक वर्षांपासून विखे पाटील घराण्याने गर जिल्ह्यावर निर्विवाद वर्चस्व गाजविले आहे.

स्वतः बाळासाहेब विखे पाटील हे अनेक वर्षे खासदार होते. याखेरीज त्यांनी केंद्रीय मंत्रीपद देखील भुषविले आहे. स्वतः राधाकृष्ण विखे पाटील हे अनेक वर्षांपासून आमदार असून ते विद्यमान सरकारमध्ये महसूलमंत्री आहेत. विखे पाटील घराणे हे राज्यात आणि केंद्रात ज्याची सत्ता असते त्याची तळी उचलण्याबाबत प्रसिद्ध आहेत. जनता त्यांच्या या पलटीमार धोरणाला कंटाळली आहे. याशिवाय या पलट्या मारताना मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार होत असून विकासाच्या नावावर जिल्ह्यामध्ये काहीही भरीव होताना दिसत नाही. यामुळेच यंदाची निवडणूक जनतेने हाती घेतली असून सर्वसामान्य जनता विरुद्ध राजपुत्र असा संघर्ष होताना दिसत आहे. यामध्ये जनता विजयी होण्याची चिन्हे असून राजपुत्राला घरी बसावे लागणार अशी चिन्हे आहेत.

# मुळा उजवा कालव्यावरील सुरक्षा कठडे तुटले

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** गेल्या काही महिन्यापासून सोनई - घोडेगाव मार्गावरील मुळा उजवा कालवा वरील पुलाचे बांधकाम व सुरक्षा रक्षक कठडे तुटली मुळे तेथून जाताना वाहनधारकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असल्याने मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

सोनई घोडेगाव मार्गावरील वाहतूक मोठ्या संख्येनं चालू आहे,त्यात पुलावरील रस्ता पार पाडण्यासाठी खड्डे व अरुंद रस्ता पार पाडण्यासाठी भीती वाटत आहे. यापूर्वी अनेक अपघात होऊन कालव्यात वाहने जाऊन जीवित हानी झालेली आहे. नव्याने वाहतूक करणारे वाहन चालकांना रात्री आदाज जर न आल्यास वाहने पडून जलसमाधी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मोठी वाहने देखील त्या ठिकाणीं वाहन बसत नाही. दोन्ही बाजूने पुलावरून जाताना धोकादायक वळण घेऊन त्या पुलावरून प्रवास करावा लागतो.अनेकाचा जीव वाचवण्यासाठी सभदित विभागाने लक्ष देतील अशी अपेक्षा वाहन धारकाकडून व्यक्त होत आहे.



## न्यायालयाची टिप्पणी

आधुनिक केसरी

मतदानयंत्राबरोबर जोडलेल्या सर्व 'व्हीव्हीपॅट'चीही (कागदी मत पडताळणी) मोजणी करण्याच्या मागणीवरील सुनावणीदरम्यान काल सर्वोच्च न्यायालयाने मतपेटीद्वारे गुप्त मतदानाच्या पर्यायामधील मानवी हाताळणीतील समस्या अधोरेखित करत घड्याळाचे काटे उलटे फिरवण्यावर आक्षेप नोंदवला. निवडणूक मतदानयंत्राद्वारे मतदाराने मत दिल्यानंतर 'व्हीव्हीपॅट' जोडलेल्या मशीनवर मताची कागदी पावतीही उपलब्ध होते. ही कागदी पावती मतदारांच्या हातात दिली जात नाही. मात्र, ही पद्धत बदलून कागदी पावती मतदारांना मतपेटीमध्ये टाकण्याची परवानगी दिली पाहिजे व मतमोजणीच्या दिवशी मतदानयंत्रे व कागदी पडताळणी एकाच वेळी झाली पाहिजे, असे मुद्दे 'असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म' (एडीआरम्) या संस्थेच्या वतीने ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी मांडले. लोकसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यातील मतदान १९ एप्रिल रोजी होत असून 'व्हीव्हीपॅट'संदर्भातील न्या. संजीव खन्ना व न्या. दीपंकर गुप्ता यांच्या खंडपीठासमोर पुढील सुनावणी १८ एप्रिल रोजी होणार आहे. मतपेटीतील कागदी पावत्यांच्या मोजणीच्या भूषण यांच्या मुद्द्यावर आक्षेप नोंदवत न्या. संजीव खन्ना यांनी, देशातील निवडणुकांमध्ये मतदानयंत्रांचा वापर होण्याआधी मतपेटीतील गुप्त मतदानपद्धतीत होणाऱ्या गैरप्रकारांचा पाढा वाचला. मतदान केंद्रांचा ताबा घेऊन बोगस मतदान कसे होत होते हे आम्ही विसरलो नाही, असे न्या. खन्ना म्हणाले. मतदानयंत्रामध्ये जाणीवपूर्वक फेरफार केले गेले तर, मतदान व मतमोजणीमध्ये समस्या निर्माण होऊ शकते. या मुद्द्यांच्या अनुषंगाने युक्तिवादावर भर देण्याची सूचना खंडपीठाने याचिकाकर्त्यांच्या वकिलांना केली. मतदानयंत्रांमध्ये फेरफार केला जाऊ शकतो, असा मुद्दाही भूषण यांनी मांडला. सलग दोन मते एकाच पक्षाला दिली गेली तर, 'व्हीव्हीपॅट'मध्येही फेरफार होऊ शकतो. एक मत एका पक्षाला तर दुसरे मत अन्य पक्षाला विभागले जाऊ शकते. मतदानयंत्रांच्या विश्वासार्हतेवर शंका घेता येते. ही मतदानयंत्रे 'ईसीआयएल' आणि 'भेल' या दोन सरकारी कंपन्या तयार करतात, या कंपनीमधील काही संचालक भाजपचे सदस्य आहेत, असा संदर्भ देत भूषण यांनी 'व्हीव्हीपॅट'मधील कागदी पावत्या मतदारांना मतदानपेटीमध्ये टाकण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे, असा युक्तिवाद केला. मतदानयंत्रातील मत व मतपेटीतील कागदी मत एकाच वेळी मोजले गेले तर मतमोजणी निर्दोष होईल. लोकसभा निवडणूक सहा आठवडे घेतली जात असून मतमोजणीसाठी आणखी एक दिवस घेतला तर फारसे बिघडणार नाही, असे भूषण यांचे म्हणणे होते. आत्ता लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघामधील फक्त ५ 'व्हीव्हीपॅट'ची मोजणी केली जाते. एकूण २ टक्के 'व्हीव्हीपॅट'ची मोजणी ही अत्यल्प ठरते. त्यामुळे सर्व 'व्हीव्हीपॅट'ची मोजणी केली पाहिजे, असा मुद्दाही मांडण्यात आला. मतदानपेटीतील कागदी पावत्या मोजण्याच्या पर्यायावर न्या. खन्ना यांनी, मानवी हाताळणीमुळे मतमोजणीमध्ये समस्या निर्माण होऊ शकतात असे मत व्यक्त केले. पक्षपातीपणासारख्या मानवी दोषांमुळे मतदानयंत्र व मतपेटीतील कागदी मतांची मोजणी यांच्यातील आकडा वेगवेगळा असल्याचा धोका वाढतो. त्यामुळे मतदान व मतमोजणीच्या विश्वासार्हतेवर शंका घेतल्या जाऊ शकतात. मतदानयंत्रातील मतांची मोजणी मशीनद्वारे होत असल्यामुळे मतमोजणीतील मानवी हस्तक्षेप टाळला जातो, असे निरीक्षण न्या. खन्ना यांनी नोंदवले.



कु. प्रियांका लोणे
संपर्क : 8208443401

## अत्याचारी इंग्रजांना चाप लावणारे चापेकर बंधू

आधुनिक केसरी

**प्लेगच्या निमित्ताने पुण्यातील जनतेवर अत्याचार करणारा अधिकारी रँड याला दामोदरपंतांनी गोळ्या घातल्या. त्या वेळी आयर्स्ट या अधिकाऱ्याला बाळकृष्णांनी गोळ्या घातल्या. या प्रकरणी फितुरी करणाऱ्याला वासुदेवांनी संपवले. या चापेकर बंधूंना इंग्रजांनी फाशी दिले. या तीन सख्या भावांनी राष्ट्रकार्यासाठी बलीदान दिले. क्रांतीकार्याची आवश्यकता म्हणून चापेकर बंधूंनी प्रतिदिन बाराशे सूर्य नमस्कार घालणे आणि एका तासात अकरा मैल पळण्याचाही वेग प्राप्त करणे दामोदर हरि चापेकर यांचे घराणे मूळचे कोकणातील वेळणेश्वरचे; मात्र त्यांचे पूर्वज पुण्याजवळील चिंचवडला येऊन स्थायिक झाले.**

तेथेच 25.6.1869 या दिवशी दामोदरपंतांचा जन्म झाला. लहानपणापासूनच दामोदरपंत आणि त्यांचे दोन्ही बंधू बाळकृष्ण आणि वासुदेव यांचा ओढा हिंदुस्थानला परदास्यातून मुक्त करण्याकडे होता.

क्रांतीकार्याची आवश्यकता म्हणून ते प्रतिदिन बाराशे सूर्यनमस्कार घालीत, तसेच एका तासात अकरा मैल पळण्याचाही वेग त्यांनी प्राप्त केला होता.

दामोदर आणि बाळकृष्ण यांनी राणी व्हिक्टोरियाच्या मुंबईतील पुतळ्याला डांबर फासून जोड्यांची माळ घालणे

दामोदरपंतांचे वडील हरिभाऊ यांचा प्रत्येक चातुर्मासात मुंबईला जाऊन प्रवचने करण्याचा प्रघात होता. 1896 च्या चातुर्मासात वडिलांबरोबर साथीला गेलेल्या दामोदर आणि बाळकृष्ण यांनी तेथील राणी व्हिक्टोरियाच्या पुतळ्याला डांबर फासून जोड्यांची माळ घातली. या काळात काँग्रेसच्या अधिवेशनांचा प्रारंभ ब्रिटिशांच्या राणीच्या स्तवनाने होत असे, हे माहीत असलेल्यांना या धाडसी कृत्याचे मोल कळेल !

सन्नीपात (प्लेग) रोगाच्या निमित्ताने इंग्रज अधिकारी रँडने नागरिकांवर अत्याचार करणे

1896 साली ग्रंथिक सन्नीपात (प्लेग) हा रोग पुण्यात झपाट्याने पसरू लागला. सरकारने या साथीचा बंदोबस्त करण्यासाठी 'रँड' नावाच्या आय.सी.एस्. अधिकाऱ्याची नेमणूक केली. त्याचे गोरे सैनिक घरे तपासण्याच्या निमित्ताने नागरिकांवर अत्याचार करू लागले.

बाळकृष्णानी वासुदेवरावांची 'गोंद्या आलाऽ रे आला' ही परवलीची आरोळी ऐकून आयर्स्टला आणि पुन्हा तीच परवलीची आरोळी ऐकू आल्याने दामोदरपंतांनी रँडला ठार मारणे

पुण्यातील हे अत्याचार चापेकर बंधूंच्या अंतःकरणात प्रतीशोधाची आग पेटवत गेले. रँडचा सूड घेण्याची संधी चापेकरबंधूंना लवकरच मिळाली. 1897 हे वर्ष राणी व्हिक्टोरियाच्या राज्यकारभाराचे 60 वे वर्ष होते. त्या निमित्ताने पुण्यातही गणेश खिंडीतील राजभवनावर एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. 22.6.1897 या रात्री गणेश खिंडीतील समारंभ आटोपल्यावर रँड आणि आयर्स्ट आपापल्या स्वतंत्र घोडागाड्यांतून निघाले. आयर्स्टची घोडागाडी पुढे होती. वासुदेवरावांची 'गोंद्या आलाऽ रे आला ' ही परवलीची आरोळी ऐकताच आणि रँडसारखी दिसणारी आयर्स्टची घोडागाडी दिसताच बाळकृष्ण चालत्या घोडागाडीत शिरले आणि त्यांनी त्यांचे 'रिव्हॉल्व्हर' आयर्स्टच्या मस्तकात रिकामे केले.

तरीही लांबून येणारी परवलीची आरोळी थांबत नाही, हे कळताच दामोदरपंत काय ते समजले. बाळकृष्णपंतांनी हिरावून घेतलेली संधी परत मिळाल्याचा आनंदही त्यांना झाला. रँडच्या गाडीमागे धावणाऱ्या वासुदेवरावांना थांबवून त्यांनी स्वतः गाडीवर उडी घेतली. छपरावरील पडदा बाजूला सारून त्यांनी पाठमोऱ्या रँडवर आपले रिव्हॉल्व्हर मोकळे केले. दामोदरपंत कार्यसिद्धीच्या आनंदात गाडीवरून खाली उतरले; पण दोन्ही घटना गाडीहाक्यांच्या ध्यानातच आल्या नाहीत.

द्रविड बंधूंच्या चुगलखोरीमुळे दामोदरपंत आणि बाळकृष्णपंत यांना, तर चुगलखोर द्रविडबंधूंना ठार मारल्याने वासुदेवपंतांना फाशीची शिक्षा होणे

काही महिन्यांनी द्रविड बंधूंच्या चुगलखोरीमुळे दामोदरपंत आणि बाळकृष्णपंत यांना पकडण्यात आले. त्यांच्यावर अभियोग चालून 18.4.1898 या दिवशी दामोदरपंतांना आणि 12.5.1899 या दिवशी बाळकृष्णपंतांना फाशी देण्यात आले. चापेकर बंधूंची ही कहाणी एवढ्यावरच संपली नाही. द्रविड बंधूंच्या चुगलखोरीची माहिती कळताच धाकटे वासुदेवपंत संतप्त झाले. महादेव रानडे नावाच्या मित्राच्या साहाय्याने त्यांनी चुगलखोर द्रविडबंधूंना ठार मारले आणि 8.5.1899 या दिवशी ते स्वतः फासावर चढले.

रँडच्या वधाच्या वेळी दामोदरपंतांचे वय होते 27 वर्षे, मधल्या बाळकृष्णपंतांचे वय होते 24 वर्षे आणि धाकट्या वासुदेवरावांचे वय होते 18 वर्षे ! या विशी-पंचवीशीतील तरुणांचा असीम त्याग आणि शौर्य पाहून आजही उर अभिमानाने भरून येतो ! तीन सख्या भावांनी राष्ट्रकार्यासाठी केलेले हे बलीदान जगात एकमेव आहे !

राष्ट्र आणि धर्म रक्षणासाठी प्रतिदिन बलोपासना करण्याचा चापेकर बंधूंचा आदर्श आपणही जोपासुया. चापेकर बंधूंना विनम्र अभिवादन !






गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

## श्रेष्ठत्वाची अभिलाषा निर्माण झाल्याशिवाय मत्सरी वृत्ती जन्म घेत नाही

आधुनिक केसरी

**श्रेष्ठत्वाची अभिलाषा निर्माण होणार नाही याची काळजी दक्षता घेतली पाहिजे आणि यासाठी आपल जीवन असतं पण दुर्दैवाने आपण हाच मुख्य उद्देश विसरतो आणि व्यर्थ मृगजळामागे धावतो.आपल मन बुद्धी निष्पाप सोज्वळ आणि निरागस ठेवण हे जीवन हितकारक असत.स्वतःला इतरांच्या पेक्षा लहान समजन हे वास्तविक मोठेपणाच लक्षण आहे.पण सध्या फार कोणीही स्वतःला लहान समजायला तयार नाही.क्षणभंगुर आयुष्य आहे त्या मध्ये अंहाकारावर स्वार होऊन स्वतःच मोठेपणा सिद्ध करण्यासाठी चालू असलेला केविलवाणा प्रयत्न जलस निर्माण करण्यासाठी कारणीभूत ठरतो.इतरांचा मोठेपणा पाहण्याची दृष्टी आणि पचणी पडण्याची वृत्ती निर्माण झाली कि आपला प्रवास योग्य मार्गावर आहे.**

आपणच सर्वकाही काही म्हणजे आपल्याकडं जे काही आहे ते इतर कोणाकडे नाही आणि भविष्यात असु पण नये त्याच बरोबर इतरांच कौतुक अथवा मोठेपणा मान्य न होणं म्हणजे आपल्या मनात जलस वृत्ती जन्माला आलेली आहे. आपणच सरस असलं पाहिजे राहिल पाहिजे. आपल्या पुढे कोणीही जाऊ नये हि भुमिका व्यक्तिमत्व विकासातील सर्वात मोठा अडथळा असतो.आणि हाच अडथळा पार करणं गरजेचं असतं.आपण ज्या क्षेत्रात कार्यरत आहेत त्या क्षेत्रात अथवा दैनंदिन जीवनात आपण आपलं योगदान देताना स्वच्छ हेतुने योगदान देण्यात गैर काहीच नाही. पण आपल्या आजुबाजुला अथवा त्या क्षेत्रात आपल्या पेक्षा कोणीतरी उत्कृष्ट आहे हे वास्तव असतं हे वास्तव नाकारता येत नाही.पण आपला अंहकार हे मान्य करू देत नाही हिच मानवी जीवनातील कठिण समस्या आहे. निरागस मन हि सर्वतम अवस्था ना लोभ ना मोह ना माया ना स्वार्थ,अशी निरागस अवस्था आपल्या मनाची सदैव राहिली तर मनात उत्पन्न होणारे सर्व भाव हे सात्विक असतात.जेव्हा आपल्या मनात सात्विक भाव असतो तेव्हा आपण आपल्या पेक्षा लहान थोर यांना श्रेष्ठ समजतो. सगळेच आपल्या पेक्षा श्रेष्ठ आहेत हा भाव आपल्या मध्ये कोणत्याही प्रकारचा विकार उत्पन्न होऊ देत नाही.पण जेव्हा असातत्विक भाव जागृत होतो तेव्हा मात्र आपल्या पुढे कोणीही जाऊ नये हि भावना कारण नसताना वाढीस लागते. आणि मग फक्त आपण श्रेष्ठ आहेत आणि याच श्रेष्ठत्वाच्या अभिलाषेतुन चांगल्या मानसाच्या मनात सुद्धा जळावु वृत्ती जलसी निर्माण होते. श्रेष्ठत्व हे काही जहागिरी नाही अथवा अनंत काळ टिकणारी बाब पण नाही. मुळात श्रेष्ठ आणि कनिष्ठ असं काही नसतं.ज्या त्या क्षेत्रात वेळेनुसार योगदान देण्याची संधी मिळत असते हि मिळालेली संधी स्वच्छ भावनेने पार पाडायची असते.पण आपण एखाद्या क्षेत्रात थोडं फार योगदान देऊ शकतो ते वेळेच्या प्रभावाने पण आपला पुरुषार्थ जगा होऊन वेळेचं श्रेय स्वतः लाटण्यासाठी उतावीळ होतो आणि मग मी माझ्या मुळं माझ्या पेक्षा पुढे कोणीही नाही अशा आविर्भावात आपण आचरण करतो हाच अंहभाव आपल्या मध्ये जळावु वृत्ती उत्पन्न करतो.आपल्या पेक्षा कोणीतरी मोठं आहे हे सत्य पचनी पडत नसल्याने जळावु वृत्ती उत्पन्न होते. अनिश्चिततेच्या जीवनात काहिच निश्चित नसताना देखील आपण ज्या क्षेत्रात कार्यरत आहेत त्या क्षेत्रातील सर्वोच्च आपणच आहोत असा एक आपला सर्वसाधारण भ्रम असतो. त्या क्षेत्रात जेव्हा इतर माणसंही हि दिसु लागतात त्या वेळी मात्र कारण नसताना देखील आपण अवस्था होतो तसं पाहिलं तर अवस्था होण्याचं काही कारणही नसतं पण आपल्या पेक्षा कोणीतरी पुढे आहे हि कल्पना मन मान्य करत नाही आणि त्यामुळे मनात जळावु वृत्ती जलशी निर्माण होते. आपल्याकडं शाश्वत ज्ञान असलं पाहिजे आणि ज्या क्षेत्रात कार्य करतोय तीथ अथवा आपल्या पातळीवर आपली विनम्रता जितकी विराट तितकंच मन बुद्धी निरागस राहते.मन बुद्धी विचार निरागस असले पाहिजे आणि परस्थिती कसीही असली तरी समभाव राहिला पाहिजे. प्रत्येक जण निसर्गाच वेगळं आवर्तन असतो.पण कोणाच्या कर्म फलावर आपण चिंतन मंथन करण्याची आवश्यकता नाही. परिपक्व विवेकशील व्यक्तिमत्व म्हणून स्वतःला घडवताना जलस या विघातक वृत्ती पासुन स्वतःला दुर ठेवण हेच अंतिमतः हितकारक ठरते. ज्याला जलस वृत्ती पासुन मुक्ती मिळवता आली त्याच जीवन फलद्रुप होत

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739






# जय श्रीरामच्या जयघोषाने नेवासेनगरी दुमदुमली..

## श्रीरामराज्य उत्सव समितीच्या वतीने नेवासेनगरीत हजारो रामभक्तांच्या उपस्थितीत शोभायात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** प्रभू श्रीरामचंद्रांच्या रामनवमी उत्सवाच्या निमित्ताने नेवासा येथील श्री रामराज्य उत्सव समितीच्या वतीने मंगळवारी दि.१६ एप्रिल रोजी सायंकाळी हजारो रामभक्तांच्या उपस्थितीत काढण्यात आलेली शोभायात्रा मिरवणूक रेकॉर्डब्रेक करणारी ठरली. "सियावर रामचंद्र की जय "जय श्रीराम"या जयघोषाने नेवासेनगरी दुमदुमली होती. या शोभायात्रा मिरवणूकीचे चौकाचौकात तोफांच्या सलामीने श्रीराम भक्तांनी उत्स्फूर्त असे स्वागत केले.

नेवासा येथील एस.टी. स्टँड जवळ असलेल्या श्री मळगंगा देवीच्या मंदिरापासून प्रभू श्रीराम मूर्तीच्या प्रतिमा मिरवणुकीस प्रारंभ झाला. श्री मध्यमेश्वर देवस्थानचे महंत बालयोगी श्री ऋषिनाथजी महाराज व घोगरगाव येथील मठाचे बालब्रह्मचारी श्री विश्वनाथजी महाराज यांच्या हस्ते प्रभू रामचंद्राच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विठ्ठलराव लंघे, विजय गडाख पाटील यांच्यासह हजारो रामभक्त उपस्थित होते. सामूहिक हनुमान चालिसा गाऊन मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी निघालेल्या शोभायात्रा मिरवणूकीत पुष्पांनी सजविलेल्या रथामध्ये प्रभू श्रीरामचंद्र सीतामाई,लक्ष्मण हनुमंतराय हा रामदरबाराचा देखावा दर्शनासाठी ठेवण्यात आला होता.साडे पाचशे वर्षाच्या प्रदीर्घ संघर्षानंतर अयोध्येत राममंदिराचे स्वप्न पूर्ण झाल्याने अयोध्या येथील श्रीराम मंदिराची प्रतिकृती मिरवणूकीच्या अग्रभागी ठेवण्यात आली होती या मंदिरामध्ये रामलल्लाची मूर्ती ठेवण्यात आली होती. या मंदिरावर केलेली विद्युत रोषणाई सर्वांचे आकर्षण ठरली होती. या पाठोपाठ संत ज्ञानेश्वर माउलींनी आपल्या भावंडांच्या समवेत चालवलेली भिंत,पुण्यश्लोक अहिल्यादेवी प्रतिकृती, महाकाल अघोरी हे देखावे देखील मिरवणुकीचे व उपस्थित हजारो रामभक्तांचे आकर्षण ठरले होते.

सदर निघालेल्या शोभयात्रेच्या मिरवणुकीत विविध राजकीय पक्षांचे व संघटनेचे नेते व पदाधिकारी, नागरिक, व्यापारी सहभागी झाले होते यातील सर्वांनी प्रभू रामचंद्रांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून दर्शन घेतले. सदर मिरवणुकीत प्रभू रामचंद्रांची प्रतिमा असलेले भगवे ध्वज हातात घेऊन युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्वांच्या कपाळावर केसरी चंदन व टीका लावण्यात येत होता.मिरवणुकीत महिला बालिका युवतींनी संख्या ही लक्षणीय होती.

या शोभायात्रा मिरवणुकीमध्ये प्रभू रामचंद्रांच्या भक्ती गीतांवर उपस्थित रामभक्तांनी जल्लोष करत ठेका धरला होता. "प्रभू रामचंद्र की जय," "पवनपुत्र हनुमान की जय" "जय श्रीराम"या जयघोषाने नेवासेनगरी दुमदुमली होती सदरच्या मिरवणुकीत युवा शक्तीने भगवा कुर्ता पायजमा परिधान करून मोठ्या प्रमाणात मिरवणुकीत सहभाग नोंदवला.

सदरची मिरवणूक एस टी. स्टँड कॉर्नरवर आल्यावर येथील उभारण्यात आलेल्या पन्नास फुटी कट आउटचे सर्वांनी पूजन केले.पंचायत समितीच्या प्रवेशद्वाराजवळ मिरवणूक आल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने युवा नेते संजय सुखदान यांच्या मार्गदर्शनाखाली मिरवणूकीत सहभागी झालेल्या हजारो रामभक्तांना थंडगार सरबताचे वाटप समितीच्या कार्यकर्त्यांनी केले.श्रीरामपूर रोडवरील श्री खोलेश्वर गणपती चौक,नगर पंचायत चौक, डॉ. हेडगेवार चौक मार्गे रात्री च्या सुमारास जुन्या पेठेतील श्रीराम मंदिरात जाऊन पोहोचली. यावेळी मिरवणूकीतील वाजत गाजत आणलेला भगवा ध्वज मंदिरावर चढविण्यात आला.व मिरवणुकीची शांततेत व मंगलमय वातावरणात सांगता करण्यात आली. यावेळी मिरवणूकीत सहभागी झालेल्या व दुरवरून आलेल्या हजारो श्रीराम भक्तांना नेवासा येथील श्री मोहिनीराज मंगल कार्यालयात प्रसादरुपी मिष्टान्न देण्यात आले.मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस अधीक्षक राकेश ओला,अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कल्लूबर्मे,शेवगाव विभागाचे पोलीस उपअधीक्षक सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक धनंजय जाधव व त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांनी चौकाचौकात चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.बंदोबस्त करण्यासाठी पोलीस,एलसीबी नगर,एस आर पी,कमांडो,होमगार्ड असा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता.

# श्रीक्षेत्र लोणी बु. येथे सखाराम महाराज श्रीराम जन्मोत्सव; भक्तांनी घेतला प्रसादाचा लाभ

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** विदर्भातील प्रती पंढरपूर म्हणून ओळखले जाणारे



तीर्थक्षेत्र म्हणजे रिसोड तालुक्यातील श्रीक्षेत्र लोणी श्री संत सखाराम महाराज तसेच अखंड हिंदुस्थानाचे दैवत असलेल्या प्रभू श्रीराम यांच्या जन्मोत्सवानिमित्त सखाराम महाराज संस्थान लोणी बू येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.
आजच्या दिवशी संत सखाराम महाराज यांच्या जन्मोत्सव निमित्ताने सकाळी 6 वाजता सखाराम महाराजांच्या समाधीला अभिषेक करण्यात आला त्यानंतर सकाळी नऊ वाजता श्री सखाराम लीलामृत या ग्रंथाचे वाचन करण्यात आले तर नंतर नऊ वाजून पंधरा मिनिटांनी श्री सखाराम महाराजांचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी पंचक्रोशितील महिला तसेच पुरुष भक्तगण हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित महिलांनी संत सखाराम महाराज जन्मोत्सवा निमित्ताने पाळणे गाऊन जन्मोत्सव साजरा केला.

त्या नंतर दहा ते बारा वाजेपर्यंत काल्याचे किर्तन होऊन ठीक बारा वाजता प्रभू श्रीराम यांच्या जन्मोत्सव साजरा महाआरती होऊन साजरा करण्यात आला. यावेळी बँड पथकाने सुरेल असे गायन करत आपली कला सादर केली.तसेच फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येऊन श्रीराम जन्मोत्सव साजरा झाला.लगेचच सखाराम महाराज संस्थांनचे वतीने मिष्ठान्न भोजनाची महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. हजारो भाविक भक्तांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.
सायंकाळी पाच वाजता दरम्यान संपूर्ण गावांमधून प्रभू श्रीराम तसेच संत सखाराम महाराज यांच्या प्रतिमा रथामध्ये ठेऊन ग्राम प्रदक्षिणा घालण्यात आली.ग्राम प्रदक्षिणा मार्गावर गावातील महिलांनी सुंदर अशी रांगोळीची आरास केली होती. अशा पद्धतीने लोणी बू येथे मोठ्या हर्षोल्लासात संत सखाराम महाराज तसेच प्रभू श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला.





# संवेदनशील भागातील मतदान पथके रवाना

## गडचिरोलीत 68 मतदान केंद्रावर 295 मतदान अधिकाऱ्यांचे एअर-लिफ्ट

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी 19 एप्रिल रोजी होणाऱ्या मतदानाकरिता 12-गडचिरोली-चिमुर लोकसभा मतदार संघातील संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर मतदान पथके रवाना करण्यास आज सुरूवात करण्यात आली. गडचिरोलीतील विविध संवेदनशील आणि अतिसंवेदनशील अशा 68 मतदान केंद्रावरील 72 निवडणूक पथकाच्या 295 मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना ईव्हीएम आणि इतर युनिटसह आज सकाळी भारतीय वायुसेना आणि भारतीय लष्कराच्या 3-एम. आय.- 17 आणि 4- ए.एल.एच. हेलिकॉप्टरच्या मदतीने बेसकॅम्पवर सुरक्षितपणे पोहचिविण्यात आले.
गडचिरोली-चिमुर लोकसभा मतदार संघात एकूण सहा विधानसभा क्षेत्रांचा समावेश असून अहेरी विधानसभा क्षेत्र अतिसंवेदनशील व नक्षलग्रस्त म्हणून ओळखला जातो. या क्षेत्रात मुलचेरा, एटापल्ली, भामरागड, अहेरी आणि सिरोंचा या पाच तालुक्यांचा समावेश आहे. जिल्हा पोलिस अधिक्षक श्री निलोत्पल यांच्या मार्गदर्शनात निवडणूक पथकांना सुरक्षीतपणे पोहचविण्यात येत आहे.



दैनिक अधुनिक केसरीमधील रामनवमीच्या विशेष पुरवणीचे विमोचन सुप्रसिद्ध उद्योगपती श्रीमान जयदीप भावे यांचे हस्ते करण्यात आले. त्यावेळी प्रसिद्ध उद्योगपती व आर्थिक सल्लागार श्रीमान किशोर पुरोहित विशेष पुरवणीचे लेखन सुधीर कोर्टीकर भावे आणि कंपनीच्या व्यवस्थापिका सौ. भावना देशमुख यांची उपस्थिती होती.



**नगरसेविका माधुरी अदवंत यांचे हस्ते दैनिक अधुनिक केसरीच्या रामनवमीच्या विशेष पुरवणीचे विमोचन**

छत्रपती संभाजीनगरमधील दैनिक अधुनिक केसरीनी सुप्रसिद्ध लेखक सुधीर कोर्टीकर यांनी लिहिलेली रामनवमीची विशेष पुरवणी काढलेली होती. छत्रपती संभाजी नगर मधील सिडको प्रभागाच्या नगरसेविका आणि महिला आघाडीच्या प्रमुख माधुरी अदवंत यांचे हस्ते संकटं मोचन हनुमान मंदिरात दैनिक अधुनिक केसरीच्या रामनवमीच्या विशेष पुरवणीचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी मंदिर उपस्थित असणाऱ्या भक्तगणांना दैनिक अधुनिक केसरीच्या आजच्या रामनवमीच्या विशेष पुरवणीच्या प्रती भेट म्हणून देण्यात आल्या. उद्घाटन प्रसंगी नगरसेविका माधुरीताई अदवंत म्हणाल्या आपणं आपले सण उत्सव मोठ्या उत्साहात साजरे करतो खरे पण त्या उत्सवाचे पौराणीक महत्त्व..या संपूर्ण सणाची अभ्यासपूर्ण माहिती आजच्या आपल्या इंग्रजी शाळेत जाणाऱ्या मराठी मुलांना होणे मोठ्या गरजेचे आहे. आपल्या सर्वांच्या परिचयाचे असणारे भारतीय सण.. उत्सव ..संस्कृतिचे. अभ्यासक सुधीर कोर्टीकर यांनी लिहिलेला प्रभू रामचंद्रांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलूंची उकलकरणारा लेख नव्या पिढीला नक्कीच मार्गदर्शनीय ठरेल असे मला वाटते... रामनवमीच्या उत्सवासाठी सगळ्यांनाच हार्दिक हार्दिक शुभेच्छा. आदरणीय माधुरीताई अदवंत यांच्या हस्ते झालेल्या छोटेखानी समारंभात प्रसिद्ध लेखिका सुनंदा डबीर, उद्योजिका सुजाता नाईक व स्वाती कुलकर्णी तसेच दुर्गा देशमुख, रेखा भाले, प्रियंवदा बिंदू, ज्योती परळीकर, जयश्री बुरांडे, सुनीता कुडे, नयन कोर्टीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



# ममुराबाद येथे ईद मिलन कार्यक्रम उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ममुराबाद येथे ईद मिलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे खुलताबाद तालुकाध्यक्ष अल्पसंख्यांक विभाग तथा गुप्र ग्रामपंचायत शेलगाव, जानेफळ, ममुराबाद येथील तंटामुक्ती अध्यक्ष, जावेद बशीर पटेल, यांच्या घरी शुरखुर्मा घेण्यासाठी, मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील सन्माननीय आमदार सतीश चव्हाण आले असता त्याच्यासोबत खुलताबाद तालुकाध्यक्ष आनिल चव्हाण, मा सभापती महेश उबाळे,भगवान कामठे,केशव जाधव, बाबासाहेब माहालकर, आजिम मनियार,रामेश्वर कदम महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटना जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर जेठे, लोकमत समाचार पत्रकार अफसर शेख ममुराबादचे उपसरपंच श्रीमान कृष्णा गावंडे पाटील, दाऊत पटेल, नाजेर पटेल, शिवाजी वेताळ, त्रिंबक बनसोड, बाळु बनसोड, उत्तम नाना, सूर्यभान आबा, कैसर पटेल, प्रभाकर सुरोडकर, बबन गायकवाड, सादीक पटेल, ताहेर पटेल सोहेल पटेल उपस्थित होते.

# नेत्यांना गावबंदी नाही; फुलंब्री मराठा क्रांती मोर्चाच्या बैठकीत एकमुखी निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** लोकसभा निवडणुकीत सकल मराठा समाजाच्यावतीने कुठलाही उमेदवार उभा करण्यात आलेला नाही, कोणत्याही उमेदवाराला मराठा क्रांती मोर्चाचा पाठिंबा नाही. तसेच या निवडणुकीत मनोज जरांगे पाटील यांचा फोटो वापरू नये, लोकसभा निवडणूक होईपर्यंत कोणत्याही नेत्याला गावबंदी करण्यात येणार नाही, असा एकमुखी निर्णय मराठा क्रांती मोर्चाच्या बैठकीत सोमवारी (दि.१५) रोजी घेण्यात आला. सदरील बैठक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात पार पडली. मराठा आरक्षणाचा लढा उभारणारे मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा झाल्यानंतर या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यांच्या सूचनेप्रमाणे बैठकीत एकापाठोपाठ एक निर्णय घेण्यात आला. मराठा समाजाने शंभर टक्के मतदान करावे, मनोज जरांगे यांनी कुठलाही अपक्ष उमेदवार दिलेला नाही. पतदार संघामध्ये कोणी फाभा राहत असेल त्याचा व मराठा समाजाचा कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. मनोज यांचे फोटो व नाव जरांगे वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. आंदोलनाचा फायदा घेऊन कोणीही समाजाचे भांडवल करू नये, अपक्ष उमेदवाराने समाजाचे भांडवल करू नये. कोणत्याही उमेदवाराने समाजाच्या नावावर मतदान मागू नये. लोकशाही प्रमाणे आपापले अस्तित्वात निवडणूक लढवावी असा निर्णय मराठा क्रांती मोर्चाच्या बैठकीत एकमुखी घेण्यात आला.

# यूपीएससी अंतर्गत प्रवरासंगम येथील गौरी देवरे झाल्या क्लास वन ऑफिसर

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** यूपीएससी अंतर्गत नेवासा तालुक्यातील प्रवरासंगम



येथील गौरी शंकरराव देवरे यांनी लास वन ऑफिसर बनून विशेष यश संपादन केले आहे. सुपर कॉम्प्युटर्स व भास्करगिरी शिक्षण संस्थेचे इंद्रायणी संस्कृत महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य शंकरराव देवरे आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाणेकरवाडी च्या आदर्श शिक्षिका सौ. मनीषा शंकरराव देवरे यांची कन्या गौरी या गेल्या काही दिवसांपूर्वीच असिस्टंट गटविकास अधिकारी या पदास पात्र ठरल्या. सर्वच स्तरांमधून गौरी यांच्या या यशाचे कौतुक आणि सन्मान सत्कार चालू असतानाच आज पुनश्च एकदा गौरी हिने तिचे अभ्यासू व्यक्तिमत्व सिद्ध केले. भारत सरकारच्या यूपीएससी अंतर्गत क्लास वन ऑफिसर हे यश प्राप्त केले आहे. गौरी यांचे या यशाबद्दल सर्व स्तरावर अभिनंदन होत आहे.अभ्यासू आणि विनम्र व्यक्तिमत्व असणाऱ्या गौरी यांनी आपल्या यशाचे श्रेय आपले आई-वडील, गुरुजन, आप्तस्वकीय आणि मित्र परिवारास दिले आहे. गौरी यांना भारत देशाची सेवा करताना अधिकाधिक दैदीप्यमान संधी मिळो आणि त्यांची यशस्वी कारकीर्द घडो अशा सदिच्छा देवगड भक्त परिवाराच्या वतीने देण्यात आल्या आहे.

# कन्नड तालुक्यात दूध उत्पादक शेतकऱ्यांवर दुष्काळचे सावट..

## जनावरांना प्यायला पाणी अन् खायला चारा नाही

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** यावर्षी दुष्काळजन्य परिस्थिती आहे. यंदा सरासरीपेक्षा अधिक अधिकच कमी पाऊस पडल्याने दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. शासनाने कन्नड तालुका दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केला नाही. यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. चारा मिळत नसल्याने व मिळणारा चारा जास्तीच्या दराने विकत घेण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. त्यामुळे अनेक शेतकरी आपली जनावरे जगविण्यासाठी मिळेल त्या भावाने चारा खरेदी करत आहेत तर काही शेतकरी जनावरे विकण्याच्या मनःस्थितीत आहेत. तसेच काही शेतकऱ्यां जवळ पाळीव जनावरे असून परिसरातील धरणात पाणी उपलब्ध नसल्याने अनेक ठिकाणी पाण्याचा शोध घेऊन आपली जानवरे कशी जगतील या विचारात आहे, दरम्यान, एप्रिल महिन्यातच उन्हाचा कडाका वाढू लागला आहे. या उन्हामुळे दूध देणाऱ्या जनावरांच्या उत्पादनावर परिणाम होत आहे. अर्थात दुधात घट होत आहे. महाग चारा व पशुखाद्य जनावरांना खायला देऊनसुद्धा म्हणावे तसे दूध मिळत नसल्याने अनेक शेतकऱ्यांचा व्यवसाय तोटयात चालला आहे. परंतु, ही दुभती जनावरे कवडीमोल दरात विकण्यास शेतकरी तयार होत नाही. त्यामुळे महागाईचे खाद्य घालून कवडीमोल दराने दूध विक्री शेतकऱ्यांना नाईलाजाने करावी लागत आहे. अशा परिस्थितीमुळेच अनेक शेतकरी अडचणीत आले आहेत. सध्या पाणी पातळी खालावली जेमतेम पाण्यावर जनावरांची तहान भागवावी लागत आहे.

परिसरातील सर्वच भागात पाण्याची कमतरता जाणवत असल्याने जनावरांचा सांभाळ कसा करायचा, या चिंतेत शेतकरीवर्ग आहे. येथील शेतकरी जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय करतात. यासाठी गायी, म्हशी, संकरीत गायी यांचे पालन करून दूध व्यवसाय करतात व त्यावरच आपला उदरनिर्वाह करतात. त्यामुळे शेतकरी जर्सी गाय व म्हैस लाखाच्या घरात खरेदी करतात परंतु सध्या दुधाला कवडीमोल भाव आहे. तर चारा मिळेना अशा दोन्ही बाजूंनी शेतकरी अडचणीत आला आहे.



### दुधाचे दर झाले कमी पशुखाद्याचे दर वाढले..

खपरी पेंड २६०० रुपये ते २७०० रुपये ५० किलोचे पोते, सरकी १२०० रुपये पोते, गोळी पेंड १७०० रुपये पोते, भुसा १४०० रुपये पोते असे पेंडीचे भाव वाढले आहेत. त्यासोबत दूध चांगले निघावे या करिता अनेक शेतकरी सकाळी गईंना गव्हाचे, बाजरीचे, मक्काचे पीठ गुड़ामध्ये टाकून देतात जेने करु न गईंच्या शरीरामध्ये कैल्शियम ची कमी होउ नये, मात्र दुधाला भाव नसल्याने अनेक शेतकरी आपल्या कडील गाया विकायला सुरवात करीत असल्याचे चित्र दिसत आहे,

### जनावरांच्या खाद्याचे दर झपाट्याने वाढले अन दुग्ध उत्पादन घटले



जनावरांच्या खाद्याचे दर मोठ्या प्रमाणात वाढल्याने शेतकरी वर्गाला या दुभत्या जनावरांना सांभाळणे अवघड झाले आहे. त्यामुळे दुष्काळाचा फटका दुग्धव्यवसायाला बसत आहे. परिसरात दुष्काळी स्थिती असल्यामुळे अनेक पशुपालक जादा दराने चारा खरेदी करत आहेत. अनेक शेतकरी पाण्याची परिस्थिती पाहून आपला ऊस, ज्वारीचा चारा, मका व अन्य पिके जनावरांच्या चाऱ्यासाठी विकत घेत आहेत. ओला चारा व पेंडीचे दर गगनाला भिडले आहेत. पशुखाद्याच्या भाववाढीमुळे पशुखाद्य विक्रीवर परिणाम झाला आहे. ऊस ३५०० ते ४५०० रुपयांपर्यंत प्रति गुंठा मिळत आहे तर ओली मका दोन हजार रुपये गुंठा व कडब्याचा गुंठा दिड हजार ते दोन हजार रुपयांपर्यंत मिळत असल्याने स्वत : जगायचं की जनावरे जगवायची हा गंभीर प्रश्न शेतक–यांपुढे आहे. त्याच दर दिवस उन्हाची वाढती तीर्वता मुळे दूग्ध उत्पादन देणारे जनावरे खुप मोठया प्रमाणात दुग्ध कमी देत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक चटका सहन करावा लागत आहे.

### संकरित गायींचा गाजवाज़ा मोठा मात्रा दर अभवि दुध उत्पादन छोटा..

सध्या परिसरात विविध राज्यातूल संकरित गाई आपल्या भागात येत आहे, घ्या गाई दूध तर भरमसाथ देता मात्र त्यावर खर्च ही भरमसाथ करवा लागतो कारण एक तर अश्या गाई कमित कमी 80 ते 90 हजाराच्या घरात मिळतात, त्यांनंतर यांना खाद्य, वेळीवर डॉ चे ट्रीटमेंट, ठंड हवेचे ठिकान, खाली बसायला मेंट, दुपारच्या वेळी ठंड पाण्याचा फवारा मारावा लागतो, दुग्ध निकते मोठया प्रमाणात मात्र खर्च ही तितकच असल्याने हा व्यवसाय नको अशी ईच्छा शेतकरी व्यक्त करीत आहे.



### पशु वैद्यकिय दवाखाने व येथील डॉक्टर बनले फक्त शोभेचे वस्तु शेतकऱ्यांना वैद्यकिय सेवा मिळेनात

: कन्नड तालुक्यात चिखलठाण येथील एका शेतकऱ्यांनी त्याची कैफीयत संगीतली येथील शेतकरी पठान अशरफ हा मागील 10 ते 12 वर्षा पासून दुग्ध व्यवसाय करतो परिस्थिति जेम तेम असल्याने थोड़े थोड़े करून गाईची संख्या वाढवली मात्र इतक्या वर्षा पासून एक दा ही त्यांना या शासकीय दवाखान्या मधून ना वैद्यकिय सेवा मिळाली ना औषधी जेव्हा पहा तेव्हा एक तर डॉक्टर भेटत नाही आणि डॉक्टर भेटले तरी दुसऱ्या कड़े विज़िट आहे म्हणुन वेळ काढून टाकतता जेव्हा शासन शेतकऱ्यांथी विविध योजना अमलात आयावी या साठी तळमळ करीत असतात मात्र या शासकीय अधिकारी कर्मचारी का दुर्लक्ष करतात या मागचे कारण काय आहे ? असा प्रश्न शेतकरी विचारात आहे संबंधित शेतकऱ्यांच्या गाईला मागच्या महिन्यात खुरकुत रोज के जकडले होते सुरवात ला एक गाय या रुगाच्या तड़ाक्यात सापडली मात्र दर रोज एक करून पुणे गाय खुरकुत ने जाखडले शेतकऱ्यांने जीवाचे राण करून गाय उभे केली मात्र रोगा मुळे गईं जाण्याचा मार्ग वर होत्या ही परिस्थिति पाहुंन शेतकऱ्यांच्या डोळ्यात पानी मायना, मात्र हे सगळे पाहुन अधिकार्याला काय घेणं देंन जे शेतकरी पैसे देतात त्या शेतकऱ्यांच्या बांधावर असे काम चोर अधिकारी कर्मचारी पहले पडतात मात्र अत्यंत गरज वंत व गरीब शेतकऱ्यांकड़े काना डोळा करीत असल्याने शेतकरी वर्ग नाराजी व्यक्त करीत आहे या ठिकाणी वरिष्ठ अधिकारी ने लक्ष्य देऊन डॉक्टर ला शेतकऱ्यांच्या बांधावर पाठवावे अशी मागणी होत आहे.

# आ. जोरगेवारांची मुनगंटीवारांच्या प्रचारार्थ रणांगणात उडी

## निवडणुकीच्या अंतिम डावात मुनगंटीवार यांनी टाकला हुकमाचा एक्का

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात महाराष्ट्राच्या लढतीकडे लक्ष लागलेल्या चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निवडणूक क्षेत्रामध्ये प्रचंड उलथापालथ करणारी घटना घडली असून या घटनेमध्ये महाराष्ट्राचे हेवीवेट मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी निवडणुकीच्या अंतिम डावात आपल्या हुकमाचा एका टाकला असून या खेळीने या लोकसभा क्षेत्रात चांगलीच खळबळ माजली आहे.
निवडणूक अंतिम टप्प्यात आली तरी महायुतीला समर्थन देणारे चंद्रपूरचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांचा मात्र महायुतीचे उमेदवार मुनगंटीवार यांच्या प्रचारामध्ये सक्रिय सहभाग घेतला नव्हता. फक्त मोदींच्या सभेच्या वेळी ते व्यासपीठावर दिसले होते. या सर्व पार्श्वभूमीवर आज महाराष्ट्राचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज थेट आ. किशोर जोरगेवार यांच्या घरीच पत्रकार परिषद घेत या पत्रकार परिषदेमध्ये आमची मने आधीच जुळलेली होती. त्यामुळे जोरगेवार हे नेहमीच आमच्या सोबत होते, असे म्हणत केंद्रात नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी सुधीर मुनगंटीवार यांना प्रचंड मताधिक्याने निवडून द्या असे आवाहन छगन भुजबळ यांनी केले. तर भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार हे पन्नास हजार पेक्षा जास्त मताधिक्याने निवडून येतील, असे मत व्यक्त केले.
आमदार किशोर जोरगेवार यांनी काही मतभेद होते ते दूर झाले आहेत त्यामुळे यंग चांदा ब्रिगेड उद्या स्थानिक शकुंतला लॉन येथे आपल्या कार्यकर्त्यांचा भव्य मेळावा घेणार असून महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार हे सुद्धा या मेळाव्याला उपस्थित राहणार असल्याचे सांगितले. सुधीर मुनगंटीवार यांना निवडून आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू असेही  मत जोरगेवार यांनी यावेळी व्यक्त केले . हा पाठिंबा हा फक्त या निवडणुकीपूरता देण्यात आला असून आपण भाजपात प्रवेश करणार नसल्याचेही मात्र त्यांनी यावेळी स्पष्ट केले. तर, आमदार जोरगेवार यांनी अंतिम टप्प्यात घेतलेल्या या निर्णयामुळे यंग चांदा ब्रिगेड च्या कार्यकर्त्यांमध्ये चांगलाच उत्साह संचारला असल्याचे दिसत होते.

# लोह्यात सापळा रचून एक वानर जेरबंद तर दुसऱ्यास इंजेक्शन फायर करून पकडले

## वन विभागाचे रेस्क्यू ऑपरेशन यशस्वी

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** मागील दोन महिन्यापासून वानर लोहा शहरातील विविध वसाहतीत माणसांना मारहाण करणे, चावा घेणे, अंगावर उडी मारून पडणे असे प्रकार होत असल्याने शहर वशिय भयभीत होते. अनेकवेळा वन विभगाकडे तक्रार केली तरी देखील वन विभाग सदरील गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष करत होता. मात्र  समाज माध्यमावर व वर्तमान पत्रातून वन विभागवार टीकेची झोड उठल्यानंतर अखेर वन विभागाकडून देवुळगल्ली भागातील एका घरावर सापळा लावून एका वानरास दि. १६ रोजी सकाळी सहा वाजता जेरबंद करण्यात आले तर दुसऱ्यास फायर करून इंजेक्शन द्वारे बेशुद्ध करून पकडण्यात वन विभागाला यश मिळाले. तर दि. १५ रोजी सायंकाळी रस्त्याने जाणाऱ्या पंचावन्न वर्षीय इसमावर वानराने गंभीर जखमी केले. वन विभागाकडून रेस्क्यु करत दोन हल्लेखोर वानर पकडल्याने शहर वाशियांनी सुटकेचा निःश्वास सोडला. लोहा शहरातील मागील दोन महिन्यांपासून सातत्याने लहान मुले, महिला-पुरुष नागरिकांवर वानर हल्ले चढवीत होता. त्यात आतापर्यंत जवळपास पंधरा ते वीस जण गंभीर जखमी झाले. दि. २० फेब्रुवारी रोजी इंदिरा नगर मधील आठ वर्षीय चिमुकल्यावर हल्ला केल्यानंतर सातत्याने वानराकडून हल्ल्याची मालिका सुरूच होती. दि. १४ एप्रिल रोजी रात्री बीडवई नगरातील तरुण अंगणात फेरफटका मारत असताना वानराने त्याच्या पायाला चावा घेवून जखमी केले. त्या तक्रारीवरून वन विभागाकडून देवुळगल्लीतील एका घरावर दि. १५ रोजी सोमवारी दुपारी सापळा ठेवला. दुसरीकडे त्याच दिवशी कै. विश्वनाथराव नळगे विद्यालयासमोरून सायंकाळी काम आटोपून पायी घराकडे जाणारे महेबुब उर्फ महाबोद्दीन लदाफ ( वय ५५ ) रा. कलालपेठ यांच्यावर त्याच वानराने हल्ला चढवला.



सदरील हल्ल्यात लादाफ गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर लोहा उपजिल्हा रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारार्थ नांदेडला हलविण्यात आले. त्यांच्यावर नांदेड येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.
देवुळगल्ली येथील घरावर ठेवलेल्या सापळ्यात दि. १६ रोजी सकाळी सहा वाजताचे दरम्यान वानर अडकले. तर दुसऱ्या वानरास प्रशिक्षित वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी बंदुकीने फायर करत बेशुद्ध करून पकडले. दोन्ही पकडलेल्या वानरास वाहनातून जंगलात सोडण्यासाठी घेवून गेल्याचे उपस्थित कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात आले. वन विभागाकडून दोन वानररास पकडण्यात आल्याने शहर वाशियानी सुटकेचा निःश्वास सोडला असला तरी सदरील पकडण्यात आलेले वानर तेच आहेत का..? अशी कुजबूज सुरू होती. पुढील कांहीं दिवसात वानराचे संकट दूर झाले का हे लवकरच समोर येईल. यशस्वीतेसाठी नांदेडचे उपवनसंरक्षक केशव वाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनरक्षक भिमसिंग ठाकुर, वनपरिक्षेत्र अधिकारी  संदीप शिंदे यांच्या नियोजनातून वनपाल अशोक क्यादरवाड, वनरक्षक परमेश्वर घुगे, व्ही. आर. मुंडे, एल. बी. पांडुरंणे, नामदेव पंढरी, रमेश राठोड, वनसेवक नारायण शेवडीकर, पिंगळे, अविनाश वागतकर, वाहन चालक मिलिंद प्रधान आदींनी अथक परिश्रम घेतले. तर पुसद येथून आलेले वन विभागाचे कुणाल लिमकर, मुखबिर शेख, अनिल इंगोले, किरण सातपुते, सुनील गिरी यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.





# राजूर येथे श्रीराम नवमी उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** देशभर प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव आनंदात साजरा केला जातो. रामभक्त या दिवसाची मोठ्या आतुरतेने वाट पाहत असतात. यादिवशी भक्ती भावाने प्रभू श्रीरामांची उपासना केली जाते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भोकरदन तालुक्यातील राजुर येथे श्रीराम नवमी उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टदार सुधाकर दानवे, एकनाथ टेपले गुरुजी, भगवान नागवे, माणिक पारवे आदी मान्यवरांच्या हस्ते प्रभू श्रीरामांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी श्री टेपले गुरुजींनी मंत्रोच्चाराच्या साह्याने प्रतिमांचे पूजन करून श्रीरामाच्या चरणी श्रीफळ अर्पण केले. यावेळी रामभक्तांनी राम नामाचा जयघोष करत जय श्रीरामच्या घोषणाही दिल्या. या प्रसंगी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सारंगधर बोडके, सचिव रामेश्वर कढवणे, उपाध्यक्ष सुखानंद पारवे, रामचंद्र नागवे,ग्रामविकास अधिकारी प्रमोद पुंगळे, प्रा.बाळासाहेब बोराडे, दिलीप मुटकुळे, गजानन डीक्कर,प्रमोद कुमकर, काकासाहेब नागवे, ज्ञानेश्वर नागवे, व्यापारी संघाचे प्रसिद्धी प्रमुख लक्ष्मण कांबळे यांसह रामभक्त उपस्थित होते.




# अजितकुमार जाधव समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

## पाडेगाव सामाजिक विकास फाउंडेशनकडून प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**
**लोणंद :** नुकताच पाडेगाव ता.फलटण येथे पुरस्कार सोहळा कार्यक्रम संपन्न करण्यात आला. पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशन यांच्या वतीने महापूरुष जयंतीच्या कार्यक्रमातून काही समाजरत्नांच्या कार्याची दखल घेत त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी सुजन फौंडेशनचे अध्यक्ष अजितकुमार जाधव यांना समाजरत्न हा पुरस्कार बहाल करण्यात आला. या पुरस्काराबद्दल अजिकुमार जाधव यांचे विशेष अभिनंदन करण्यात येत आहे.
हा पुरस्कार केंद्रीय मंत्री श्रीमती स्मृति इराणी यांच्या मातोश्री उद्योजिका श्रीमती शिबानी बागची यांच्या हस्ते आणि समाज प्रबोधनकार अभिनेत्री मेघना झुंझाम यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये देण्यात आला.यावेळी कार्यक्रमा करिता सरपंच राहुल कोकरे,रोहिणी जाधव,आसावरी नेवसे हे उपस्थित होते.
समाजमनाचा सामाजिक, वैचारिक, बौद्धिक, आर्थिक, समाजहित व देशहिताच्या कार्याचा स्तर उंचवावा याकरीता महाराष्ट्रभर सुजन फौंडेशनच्या माध्यमातून विविध सामाजिक प्रबोधनाचे,थोर  महापुरुषांचे विचार प्रसार व प्रचार कार्य करण्याचे काम अजितकुमार जाधव हे गेली अनेक वर्षापासून करत आहेत.अजितकुमार जाधव हे प्रामुख्याने महापुरुषांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांच्या विचार प्रसाराचे कृतीशील कार्य, भारतीय स्वातंत्र्य व हुतात्म्यांना अभिवादन, क्रांतिकार्य उजाळा, लेक वाचवा, समाज घडवा, अबाल वृद्ध, विद्यार्थी व महिला करीता विविध उपक्रमांनी कार्य करतात. जवळपास वीसपेक्षा अधिक पुस्तिकेचे संपादन व महापुरुषांच्या प्रतिमा व दिनदर्शिकाचे संपादन व प्रकाशन करून विनामूल्य वितरित करून समाजहिताचे कार्य करीत आहेत. कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रवीण बनकर, सुत्रसंचालन गिरीश बनकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न करण्यासाठी पाडेगाव सामाजिक विकास फौंडेशन चे कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमासाठी उपस्थित सर्वांचे प्रभाकर नेवसे यांनी आभार मानले.

# मुलांचे भावविश्व समृद्ध करणाऱ्या कथा : कष्टाच्या वाटा

आधुनिक केसरी

शरीराला अन्नाची जेवढी गरज तेवढीच मनाला



वाचनाची. वाचनाने व्यक्तिमत्त्व समृद्ध होण्यास नक्कीच मदत होते. त्यातही कथा किंवा गोष्टी हा साहित्यप्रकार अबालवृद्धांना आवडणारा.'कष्टाच्या वाटा' हा लेखक अय्युब पठाण यांचा नुकताच प्रकाशित झालेला कथासंग्रह. ताई पब्लिकेशनने प्रकाशित केलेल्या या संग्रहात एकूण एकोणीस कथांचा समावेश केला असून सरदार जाधव यांनी या पुस्तकाचं मुखपृष्ठ साकारलं आहे.

अपघातात आई वडील गमावणाऱ्या राजू व त्याच्या परिस्थितीला ओळखून त्याला जिव्हाळा लावणाऱ्या पाटील सरांची गुरूची ममता ही कथा गुरू शिष्यातील नात्याला अधोरेखित करते.

लहानपणीच वडिलांचं छत्र हरवलेल्या, शाळेत वृक्ष लावून त्यास आपल्या वडिलांचं नाव देणाऱ्या अनिलची 'अनोखं वृक्षारोपण' ही कथा अनोखी असली तरी मन हेलावणारी आहे.

आपल्या जीवनात दानाला फार महत्त्व आहे. परंतू दान कशाचं करावं,कुणाला करावं हे सुद्धा तितकंच महत्त्वाचं आहे.आज जातीपाती अधिक टोकदार होत असताना आपली व आपल्या पत्नीची एक-एक किडनी शाळेतील गुणवंत विद्यार्थी करीम याला दान करणाऱ्या माने गुरूजी व बाई यांची 'दान' ही कथा नवा आदर्श घालून देते.

कॉलनीच्या जमीन मालकाने मैदानाची मोकळी जागा स्वार्थासाठी बिल्डरला विकल्यानंतर त्याविरूद्ध लढून न्याय मिळवणाऱ्या विनय, अनिल, अब्दुल व सुनिलला या मुलांची 'मैदान वाचवुया' ही कथा आजकालच्या मोबाईललाच आपले विश्व समजणाऱ्या मुलांच्या तसेच मोठ्या माणसांच्याही डोळ्यात अंजन घालणारी आहे.




काट्यात राहणाऱ्या गुलाबाची आणि वनदेवीची 'गुलाब अन् काटे' ही कथा लहानग्यांना नक्कीच आवडेल. सुंदरी नावाच्या गाईच्या वासराला जिवाची पर्वा न करता वाचवणाऱ्या साहसी मुलांची कथा 'कौतुकाची थाप' ही बालकांच्या मनात भूतदया जागवणारी आहे. देशसेवेसाठी बलिदान देणाऱ्या रमेश, त्याला अग्नी देणारा इवलासा अंकुश,आक्रोश करणारे त्याचे वडील, काळजाला चिरणाऱ्या पत्नी पुजाच्या किंचाळ्या..'वीर जवान 'ही कथा वाचून मन सुन्न होतं. पण देशभक्तीची ज्योत या कथेतून फुलवण्यात लेखकाचं यश आहे.

जत्रा, नागपंचमीचा सण, सुगी, नदीकाठ,वाचन, झुमरी इत्यादी कथांमधून संस्काराची पेरणी होते.परंतु या कथांत पात्र आणि संवादाची गुंफण अधिक प्रभावी ठरली असती.

उपकाराची फेड, सत्कर्माचे फळ या कथाही छान जमून आल्या आहेत.लेखक स्वतः शिक्षक असल्याने ते बालकात रमतात.त्यांच्या भावविश्वाची जाणीव त्यांना आहे. मुलांची भाषा त्यांना अवगत आहे.या बालकांच्या मनात जर चांगले विचार रूजवले केली तर भविष्यात निकोप समाजाचा पाया घातला जाईल या विशाल हेतूने त्यांनी या कथांची निर्मिती केली आहे.

बालकांत संस्कार रूजवण्यासोबतच त्यांच्यात मानवी मुल्यांची पेरणी या कथा करतात.

बाल,कुमार,किशोर तसेच सर्वच वयोगटातील वाचकांनी या कथा नक्की वाचाव्यात.तेव्हा हे पुस्तक तुमच्या संग्रही असायलाच हवे.भविष्यात लेखकाच्या हातून अशा संस्कारक्षम कथांची निर्मिती व्हावी यासाठी खूप खूप शुभेच्छा.

**-मनीषा कुलकर्णी-आष्टीकर, परभणी**

**पुस्तकाचे नाव - कष्टाच्या वाटा**
**(बाल-किशोर-कुमार कथा)**
**लेखक-अय्युब पठाण लोहगावकर**
**प्रकाशन- ताई पब्लिकेशन,औरंगाबाद**
**किंमत- 100रू**



# मातृभाषा ज्ञानगौरव पुरस्काराने पवार सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** विद्याभवन हायस्कूल कळंब या प्रशालेतील नवोपक्रमशील सहशिक्षक सोपान पवार यांचे शैक्षणिक कार्य विविध शैक्षणिक उपक्रम विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकास, राज्यस्तर जिल्हास्तर तज्ञ मार्गदर्शक म्हणून कार्य, विविध विषयांवर शैक्षणिक लेखन, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ पुणे बालभारती सदस्य कार्यशाळेसाठी निवड, राज्यस्तर, जिल्हास्तर निबंध लेखन पुरस्कार प्राप्त, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये शोधनिबंध सादर, मराठी विषयाचे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना अनेक शाळेत मार्गदर्शन, साने गुरुजी कथामाला विविध उपक्रम अशा विविध शैक्षणिक उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघ धाराशिव यांच्यावतीने मातृभाषा ज्ञान गौरव पुरस्कार मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश टेकाळे, अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला धाराशिव अध्यक्ष डी के कुलकर्णी, अन्नदाते बंडोपंत दशरथ डॉ. लक्ष्मण जाधवर, सौ महानंदा जाधवर (आदर्श माता), ह.भ.प. महादेव महाराज अडसूळ, मराठी साहित्य परिषद मराठवाडा कार्याध्यक्ष मुख्याध्यापक परमेश्वर पालकर, माधव सिंह रजपूत, व इतर मान्यवर यांच्या हस्ते सन्मानपत्र शाल पुष्पगुच्छ देऊन सोपान पवार यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला तसेच याप्रसंगी अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद कळंब तालुका कार्याध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी संजय देवडा, डॉ गिरीश कुलकर्णी, रवी नारकर व इतर पदाधिकारी यांच्या वतीने सोपान पवार यांचा सत्कार करण्यात आला. प्रदीप यादव, रमेश शिंदे या प्रसंगी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी. के. कुलकर्णी सर यांनी केले तर आभार डॉ. अभिजीत जाधवर यांनी मानले.

# प्रशासनाला पडला दुष्काळाचा विसर

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात सर्वत्र दुष्काळ व दुष्काळी चित्र असले तरी प्रशासन मात्र गाफील म्हणा की दुर्लक्ष याकडे लक्ष नसल्याने तालुकाभर नागरिक व गुरांचे हालहाल सुरु असुण मजुर शेतमजुर गुरेढोरे नागरिक परेशान आहे परंतु प्रशासनाचे एकच लक्ष निवडणूक फक्त हे चालु असल्याचे चित्र आहे.

गत वर्षी पावसाने सरासरी ही ओलांडली नाही. अर्ध्यापेक्षा कमी पाऊस झाल्याने नदी नाले विहिरी तलाव कोरडे होते.तर पावसाअभावी खरीप हंगामात पिकांना मोठा फटका बसला. गतवर्षि पाऊस वेळेवर सुरु होवून वेळेवरच थांबला. ऐन पावसाळ्यात पावसाअभावी व तदनंतर पावसामुळे खरिप व रब्बी पिकांना फटका बसला हाती तोंडी आलेले पिक वाया गेली तर चारा ही हाती आले नाही. अधूनमधून अवकाळीने अवकाळा लावून पिकांना चांगलाच फटका दिला. शासनाने याचे पंचनामा करून सततच्या मागणी नंतर दुष्काळ मधे गृह्य धरले.नुकसान भरपाईत कुणाला मिळाले कुणाला नाही केवायसी च्या नावाखाली अद्यापही चालढकल सुरु आहे. दुष्काळामुळे मजुर शेतमजुर यांच्या हाताला काम नाही पैशाची चणचण भासत आहे,गुरांढोरांना चारा पाणी नाही,अनेक ठिकाणी पाणी टंचाई आहे, सवलत सुविधा कोठे दिसेना,गुरांना चारा पाणी छावण्या नाही, दुष्काळ दिसत नसला तरी यात सर्व तालुकाभर नागरिक गुरेढोरे होरपळत आहे.त्यांचे हाल अपेष्टा परेशान आहे.तर दुसरीकडे प्रशासन फक्त एक च लक्ष निवडणूक फक्त या कार्यक्रमात व्यस्त आहे. त्यात लोकप्रतिनिधी ला ही याची गंभीरता नसल्याने तेही हेच बोल बोलत आहे. याकडे कोण लक्ष देणार हा मोठा प्रश्न आहे हे विशेष.

# विराट महालेचा जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** कळंबा महाली येथील रहिवाशी तसेच



ऍड. रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालयातील कर्मचारी श्री संदीप हिरामण महाले यांचा मुलगा विराट संदीप महाले याची खुल्या शहरी जागेमधुन निवड झाली आहे. सदर विद्यार्थ्याने दि.१० एप्रिल रोजी नवोदय विद्यालयात प्रवेश घेतला आहे.

विराट हा भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा साखरा येथील विद्यार्थी असुन, सदरील शाळेमधून एकूण १८ विद्यार्थी नवोदयसाठी पात्र ठरले आहेत. तसेच विराटने परिसरातील झालेल्या अनेक स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी केली आहे. यामधे वाशिम येथील माऊली कोचिंग क्लासेस अंतर्गत घेण्यात आलेल्या टॅलेंट सर्च स्पर्धेमध्ये वर्ग ५ वी मधुन प्रथम क्रमांक पटकावला आहे.तर कळंबा महाली येथील स्पर्धेत गट क मधून द्वितीय क्रमांक पटकावला आहे.तर सामान्य ज्ञान स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला आहे. विराटने अतिशय परिश्रम घेत बुध्दीच्या बळावर सदर यश संपादन केले आहे. आपल्या यशाचे श्रेय शाळेचे शिक्षक विनोद झनक, राजु महाले , शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक तसेच आईवडील यांना दिले आहे.




# पालघरमध्ये भाजपाच्या उमेदवारीचे बनावट पत्र प्रसिद्ध; प्रदेश भाजपातर्फे पोलिसांत तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**पालघर :** लोकसभा मतदारसंघासाठी भारतीय जनता पार्टीतर्फे प्रकाश कृष्णा निकम यांना उमेदवारी दिल्याबाबतचे भाजपा केंद्रीय कार्यालयाचे खोटे पत्र प्रसारित केल्याबद्दल प्रदेश भाजपातर्फे पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून या तक्रारीनुसार पोलिसांनी तपास सुरू केला आहे. भारतीय जनता पार्टीच्या आचार संहिता व कायदा विभागाचे प्रदेश अध्यक्ष ॲड.अखिलेश चौबे यांनी ही माहिती बुधवारी भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. भाजपाच्या खोट्या लेटरहेडवर व्हायरल करण्यात आलेले हे पत्र म्हणजे दोन पक्षांत तेढ निर्माण करण्यासाठी रचलेला कट असल्याचेही ॲड.चौबे यांनी सांगितले. प्रदेश भाजपा कायदा प्रकोष्ठचे संयोजक ॲड. शहाजी शिंदे, प्रदेश प्रवक्ते ओमप्रकाश चौहान यावेळी उपस्थित होते.

चौबे यांनी सांगितले की, पालघर मतदारसंघासाठी प्रकाश निकम यांना भाजपातर्फे उमेदवारी दिल्याचे पक्षाचे केंद्रीय कार्यालयाचे बनावट पत्र समाजमाध्यमांतून प्रसारित झाल्याचे कळताच आपण त्या विरोधात मंगळवारी रात्री उशिरा मरिन ड्राइव्ह पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. भाजपाच्या बनावट लेटरहेडवर शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष असलेल्या प्रकाश कृष्णा निकम यांना उमेदवारी दिल्याचे पत्र प्रसिद्ध करून भाजपा - शिवसेना या दोन्ही पक्षांत तेढ निर्माण करण्यासाठी रचलेला हा कट असून त्याची कसून चौकशी करण्याची मागणी आपण केली आहे.

पालघर लोकसभा जागेसाठी अद्याप महायुतीचा उमेदवार ठरलेला नसताना जाणूनबुजून खोटे पत्र व्हायरल करून महायुतीच्या भाजपा आणि शिवसेना या दोन पक्षांमध्ये नाहक तेढ निर्माण करण्याचा केलेला हा प्रयत्न हाणून पाडू असेही चौबे यांनी सांगितले. या प्रकरणी अज्ञात इसमाविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम 420, 467, 468 आणि 417 अंतर्गत तक्रार दाखल करण्यात आल्याचे ॲड. चौबे यांनी सांगितले.

# रेणुका माता पंचमी महोत्सवला सुरुवात; डफ वाजवणे, मंडप तमाशा मनोरंजन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे आज दि.१७ रोजी पंचमी महोत्सवला सुरुवात झाली असुण मंदिर येथे डफ वाजविणे, पंचमीसाठी परंपरागत मंडप टाकणे, लोक मनोरंजनसाठी तमाशा आदि प्रक्रिया सुरू झाली आहे. जागृत दैवत तथा पंचक्रोशीतील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान श्री रेणुका माता यात्रा निमित्त चैत्र शु ९ रामनवमी पंचमी महोत्सवल परंपरा गत भव्य मंडप टाकत तथा रेणुका माता मंदिर परिसरात डफ वाजविणे व नागरिकांसाठी मनोरंजन म्हणून सुरुवात झाली आहे.



१७एप्रिल ते २२एप्रिल पंचमी महोत्सव व १७ रोजी रामनवमी श्रीराम महोत्सव कार्यक्रम चैत्र शु १४, २२रोजी सोमवारी बोहडा, सकाळी नृसिंहांचे सोंग मिरवणूक तथा पंचमी महोत्सव ची सांगता . चैत्र पौर्णिमा दि.२३ हनुमान जयंती तथा हनुमान जन्मोत्सव कार्यक्रम .तर चैत्र कृ४ २८रविवार रोजी कुस्ती आखाडा चे आयोजन करण्यात आले आहे.पंचमी तथा यात्रा महोत्सव बघता विश्वस्त (ट्रस्ट) कडून पुर्ण तयारी करण्यात आली आहे. रेणुका माता मंदिर तथा परिसरात कमान भिंती विविध रंगरंगोटीने सजल्या आहे,विद्युत रोषणाईने मंदिर व परिसर झगमगाट दिसतो आहे.रेणुका माता पंचमी व यात्राला अतिशय महत्त्व असुण पंचमी यात्रा महोत्सव साठी गावासह परिसरातील भाविक भक्तांनी आता पासूनच दर्शनासाठी गर्दी केली आहे.पंचमी महोत्सव पाच दिवस तर यात्रा महोत्सव पंद्राह दिवस सुरु असतो यात्रेत मोठ्या संख्येने विविध दुकानें हाटेलस फरसन दुकान, झोके, जंमपीग, खेळनी, तमाशा, फिरते पिक्चर्स थेयटर, किराणा, कापड, रेडिमेड, प्लास्टिक खेळणी, ज्वेलरी, भांडी दुकाने, झोरे सतरंज्या दुकाना, चप्पल बूट दुकाना आदि एक ना अनेक दुकाना यात्रेत येवून व्यवसाय करतात.गाव पंचक्रोशी सह जिल्हा महाराष्ट्र भरातून भाविक भक्त येथे हजर होतात हे विशेष.

# डॉ. बाबासाहेबांचा अपमान करणाऱ्या काँग्रेसला धडा शिकवा

## सुधीर मुनगंटीवार यांनी घेतला काँग्रेसचा खरपूस समाचार : सभेला उसळली रेकॉर्डब्रेक गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** काँग्रेस हे जळते घर आहे, असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे कार्य काँग्रेसला कधीच जमले नाही. काँग्रेसने कायम बाबासाहेबांचा अपमान केला. एवढेच नव्हे तर काँग्रेसने दोनवेळा त्यांचा पराभवही केला. त्यामुळे बाबासाहेबांचा पराभव करणाऱ्या काँग्रेसचा चंद्रपूर लोकसभा निवडणुकीत पराभव करा आणि त्यांना धडा शिकवा", असे आवाहन चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई (आठवले गट), पिरीपा (कवाडे गट), रासप मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

चंद्रपूर लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप महायुतीचे उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारार्थ घुग्गुस येथे जाहीर सभा पार पडली. यावेळी जाहीर सभेला माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, विवेक बोढे, विनोद चौधरी, निरीक्षण तांडरा, साजन गोहणे, हसन शेख, इर्शाद कुरेशी, चिंतानल बोगा, श्रीनिवास बोचकुला, रवी डिकोंडा, अनिल मंत्रीवार, संतोष नुने, श्रीनिवास रामटेके यांच्यासह शेकडो कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या जाहीर सभेला संबोधित करताना ना. मुनगंटीवार यांनी काँग्रेस पक्षाचा खरपूस समाचार घेतला. पुढे बोलताना ते म्हणाले, 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा काँग्रेस पक्षाने १९५२ सालच्या लोकसभेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत मुंबईत आणि १९५४ च्या भंडारा लोकसभा पोटनिवडणुकीत पराभव केला होता. काँग्रेसमध्ये अनेक बॅरिस्टर्स होते पण डॉ. आंबेडकरांचा अभ्यास आणि विद्वत्ता बघता कदाचित ते राजकीयदृष्ट्या गैरसोयीचे होईल, अशी भावना काँग्रेसची होती. जर बाबासाहेबांचे वजन वाढले तर कदाचित काँग्रेसला दलित बांधवांनाही सत्तेत समाविष्ट करून घ्यावे लागेल, या कारणाने काँग्रेसने आंबेडकरांना बिनविरोध निवडून आणले नाही, त्यांचाच पराभव केला. जो काँग्रेस पक्ष आपल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पराभव करतो, वारंवार अपमान करतो, त्या काँग्रेसला तुम्ही मतदान कसे करू शकता? असा प्रश्न त्यांनी घुग्गुस येथील जनतेला विचारला. येत्या चंद्रपूर लोकसभा निवडणुकीत १९ तारखेला भाजप महायुतीला मतदान करून बाबासाहेबांच्या अपमानाचा सूड घ्या, असे आवाहन त्यांनी केले.

काँग्रेसने आजवर प्रत्येक निवडणुकीत दलित समाजाचा वापर करून त्यांना फेकून देण्याचा, दलितांना सतत फसवण्याचा आणि आंबेडकरी चळवळीचा तेजोभंग करण्याचाच गोरखधंदा सातत्याने केला, हे कसे विसरता येईल? काँग्रेसने दलितांबरोबर बेईमानी, दगाबाजी करताना सरंजामी-सामंती कुटुंबशाहीचे नात्यागोत्याचे राजकारण करून दलितांना सत्तेत सहभागी करून न घेता त्यांच्यावर वरपासून खालपर्यंत राज्य केले. काँग्रेसचे हे पाप दलित समाज कधीही विसरणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



मुनगंटीवार यांचे विचार ऐकण्यासाठी घुग्गुस परिसरातील कार्यकर्त्यांनी जाहीर सभेला रेकॉर्ड ब्रेक गर्दी केली. यावेळी दोनशे मुस्लिम कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या सर्वांच्या गळ्यात भाजपचा दुपट्टा घालून ना. मुनगंटीवार यांनी स्वागत करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.




# गारखेडा परिसरात आपत्कालीन भारनियमनाची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** वाढत्या तापमानामुळे व त्यामुळे वाढलेल्या विजेच्या मागणीमुळे गारखेडा परिसरातील काही वीजवाहिन्यांवर महावितरणला नाईलाजास्तव आपत्कालीन भारनियमन करावे लागू शकते. मात्र दोन दिवसांत परिस्थिती पूर्ववत होणार असून वीजग्राहकांनी संयम बाळगून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

एन-४ येथील महावितरणच्या ३३ केव्ही उपकेंद्रातील १० एमव्हीए क्षमतेचे पॉवर ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाल्यामुळे त्यावरील ११ केव्ही गारखेडा वाहिनीचा भार ३३ केव्ही सूतगिरणी उपकेंद्रावर घेण्यात आलेला आहे. परंतु मागील ३ ते ४ दिवसांपासून उष्णतेमुळे अचानक वीज मागणी वाढली आहे. त्यामुळे ३३ केव्ही सूतगिरणी उपकेंद्रामधील १० एमव्हीए क्षमतेचा पॉवर ट्रान्सफॉर्मर ओव्हरलोड होत आहे. परिणामी काही वीजवाहिन्यांवर रात्री १० ते २ वाजेपर्यंत कुठल्याही वेळेस सुमारे २ तास आपत्कालीन भारनियमन होण्याची शक्यता आहे. यात ११ केव्ही गजाननगर वाहिनीवरील सारंग हाउसिंग सोसायटी, नंदिग्राम नंदीग्राम सोसायटी, कडा कार्यालय, वेद मंत्रा,



चैतन्य हाउसिंग सोसायटी, गजानन कॉलनी, विशालनगर, अलंकार सोसायटी, त्रिमूर्ती चौक, शांतिनिकेतन कॉलनी, उत्तमनगर, भानुदासनगर, विष्णुनगर, अरिहंतनगर, मित्रनगर, ११ केव्ही सुहास कॉलनी वाहिनी व ११ केव्ही गारखेडा वाहिनीवरील यश मुथियान, नाथ प्रांगण, साहस सोसायटी, आदिनाथनगर, भांडार चौक, के पॉन्ड हॉस्पिटल, प्रेरणानगर, विजय चौक, स्वप्ननगरी, माणिकनगर, हनुमाननगर, पुंडलिकनगर, हुसेन कॉलनी, छत्रपतीनगर, ११ केव्ही मुथा वाहिनीवरील मेहरनगर, गारखेडा गाव, उल्कानगरी, सहयोगनगर, हिरण्यनगर, हनुमाननगर, शास्त्रीनगर, भगवती कॉलनी, अशोकनगर, हेडगेवार हॉस्पिटल, त्रिमूर्ती कॉम्प्लेक्स आदी भागांत वीजपुरवठा बाधित होऊ शकतो. एन-४ उपकेंद्रामधील पॉवर ट्रान्सफॉर्मर गुरुवारी बसविण्यात येणार आहे. त्यानंतर सर्व समस्या मार्गी लागतील. तरी सर्व ग्राहकांनी संयम बाळगून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे. दरम्यान, पॉवर ट्रान्सफॉर्मर बसविण्याच्या कामासाठी एन-४ उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या काही वसाहतींचा वीजपुरवठा गुरुवारी (१८ एप्रिल) सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत बंद राहणार आहे. यात मालाणी डीटीसी, मायानगर, सिडको एन-२, एन-३, अजयदीप काम्प्लेक्स, मानसी हॉटेल, गुरुसाहनीनगर, तिरुपती पार्क, चौधरी डीटीसी, एन-४, पारिजातनगर, विवेकानंदनगर, विश्रांतीनगर, उच्च न्यायालय, गारखेडा परिसराचा समावेश आहे, असे महावितरणने कळवले आहे.

# छत्तीसगडच्या कांकेरमध्ये चकमकीत २९ नक्षलवाद्यांना कंठस्नान

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रकांत पतरंगे**

**गडचिरोली :** छत्तीसगडमधील कांकेर जिल्ह्यामध्ये सुरक्षा दलाच्या जवानांबरोबर मंगळवारी झालेल्या चकमकीत २९ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. या चकमकीत सुरक्षा दलाचे तीन जवान जखमी झाले असून, घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा व दारूगोळा जप्त करण्यात आला आहे.

पहिल्या टप्प्यातील लोकसभा निवडणुकीपूर्वी ही घटना घडल्याने गडचिरोली पोलिसदेखील अलर्ट झाले आहेत. नक्षलवाद्याचा गड समजल्या जाणाऱ्या अबुजमाड जंगलातील छत्तीसगडच्या छोटे बेठिया पोलिस ठाण्याच्या क्षेत्रात मंगळवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) आणि राज्य पोलिसांच्या डिस्ट्रिक्ट रिझर्व्ह गार्ड (डीआरजी) यांनी नक्षलवाद्यांच्या शोधासाठी संयुक्त मोहीम हाती घेतली होती. कांकेर जिल्ह्यामध्ये नक्षलवाद्यांचा बीमोड करण्यासाठी बीएसएफचे जवान मोठ्या संख्येने तैनात करण्यात आले आहेत. यावेळी झालेल्या चकमकीत नक्षली कमांडर शंकर राव व ललिता ठार झाली आहे.

**अन् अचानक झाला गोळीबार :** लोकसभा निवडणुकांच्या आधी नक्षलग्रस्त भागात सुरक्षा दलांनी अधिक कडक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. या भागांमध्ये निवडणूक प्रक्रियेत कोणताही अडथळा येऊ नये म्हणून ही पावले उचलण्यात आली आहेत. बीएसएफ आणि जिल्हा राखीव गार्ड यांची संयुक्त टीम नक्षलविरोधी अभियानासाठी जात असताना नक्षल्यांनी अचानक गोळीबार केला. प्रत्युत्तरात जवानांनीही गोळीबार केला.

बीएसएफच्या जवानांसह तीन जवान चकमकीत जखमी झाले असून, त्यांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे छत्तीसगड पोलिसांनी सांगितले. त्यापैकी एका जवानाच्या पायाला गोळी लागली असून, त्याची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे सांगण्यात आले.

छत्तीसगडमधील नक्षलवाद्यांचा गड असलेला कांकेर परिसर हा बस्तर जिल्ह्याचा भाग होता. १९९८ मध्ये कांकेरला स्वतंत्र जिल्हा घोषित करण्यात आला. मंगळवारी झालेली चकमक ही बिनागुंडा व कोरोनार गावादरम्यान दुपारी घडली. २०२४ वर्ष सुरू झाल्यापासूनचार महिन्यात आतापर्यंत बस्तर परिसरात तब्बल ७९ नक्षल्यांचा खात्मा करण्यात आला.

महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात गडचिरोली-चिमूरसाठी १९ एप्रिलला मतदान होत आहे. याअनुषंगाने १६ एप्रिललाच १५ हजारांहून अधिक सुरक्षा जवान तैनात झाले आहेत. दुर्गम, अतिदुर्गम भागात हेलिकॉप्टरने मतदान यंत्र व अधिकाऱ्यांना पोहोचविण्यात आले आहे. मतदानाच्या तीन दिवस आधीच छत्तीसगड सीमेवर छत्तीसगड पोलिस व माओवाद्यांतील चकमकीनंतर २९ नक्षल्यांना कंठस्नान घालण्यात यश आले आहे.

नक्षलवाद्यांसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. या घटनेच्या अनुषंगाने ते पुन्हा खवळण्याची शक्यता लक्षात घेता, सुरक्षा यंत्रणा सजग झाली आहे. सीमावर्ती भागातील सर्व हालचालींवर नजर ठेवली जात असून, अनुचित प्रकार घडणार नाही, यासाठी पोलिस सज्ज आहेत, अशी माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली. चकमकीच्या ठिकाणी सुरुवातीला १८ व नंतर ११ मृतदेह सापडले, त्यामुळे एकूण २९ माओवादी ठार झाले. घटनास्थळावरून आधुनिक रायफल, सात एके ४७ रायफल, ३ एलएमजी जप्त करण्यात आले आहेत. चकमकीत ठार झालेला शंकर राव याच्यावर २५ लाखांचे बक्षीस होते.

कांकेर जिल्ह्यातील चकमकीत ठार झालेल्या नक्षलवाद्यांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. गडचिरोलीपासून १९ किलोमीटर अंतरावर घडलेल्या या घटनेने खळबळ उडाली असून, सुरक्षा यंत्रणा अलर्ट आहे.

# वरठाण तिडका रस्त्यावर अपघात; दोन ठार तर दोन जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील वरठाण -तिडका रस्त्यावर दोन दुचाकीचा समोरासमोर जोरदार धडक होऊन दोन जण जागीच ठार झाले असुन दोन गंभीर झाल्याची घटना सोयगांव तालुक्यातील वरठाण तिडका रस्त्यावर सोमवारी सायंकाळी पाचच्या घडली. या अपघातात सुनील विक्रम बागुल वय ३३ (रा. वाडीसुतांडा ता. सोयगाव) आहेत. काशीनाथ विठ्ठल पाटील वय ३२, रा.पिंप्रि ता.पाचोरा अशी मृतांची नावे पाचोरा तालुक्यातील पिंप्री येथील काशीनाथ पाटील व राहुल पाटील हे दोघे मोटारसायकलने (MH19 EH 9811) पिंप्रि येथुन किन्ही येथे जात होते, तर सोयगाव तालुक्यातील वाडीसुतांडा येथील सुनील बागुल व सतीश मोरे हे दोघे मोटारसायकलने (MH-19 BW 8542) वाडी येथून तिडकाकडे जात असताना वरठाण तिडका रस्त्यावर दोघांची समोरासमोर जोरदार धडक होऊन सुनील विक्रम बागुल (वय ३३) रा. वाडी व काशीनाथ विठ्ठल पाटील (वय ३२ ) रा. पिंप्रि हे जागीच ठार झाले असून राहूल त्र्यंबक पाटील, रा. पिंप्रिं सतीश सखाराम मोरे छत्रपती संभाजीनगर प्लस संस्करण रा. वाडीसुतांडा हे दोघे गंभीर जखमी झाल् आहेत. घटनास्थळी उपनिरीक्षक रज्जाक शेख, जमादार संदीप सुसर, विकास दुबेले श्रीकांत तळेगावकर जावून ग्रामस्थांच्य मदतीने जखमींना पाचोरा येथील दवाखान्यात पाठवले.



# नीलेश लंके यांचे नगर शहरात जोरदार शक्तीप्रदर्शन

## शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी, आप सह आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**अहमदनगर :** नगर दक्षिण लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्या स्वाभिमान जनसंवाद यात्रा अन मोटारसायकल रॅलीला नगर शहरात बुधवारी (दि.१७) प्रचंड प्रतिसाद मिळाला. शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी, आप सह आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यामध्ये उत्स्फूर्तपणे मोठ्या संख्येने सहभागी झाल्याने निलेश लंके यांनी नगर शहरात मोठे शक्ती[प्रदर्शन केल्याचे दिसून आले.
शहरातील दिल्लीगेट येथून सकाळी भव्य प्रचारफेरी व मोटारसायकल रॅली काढण्यात आली. याप्रसंगी उमेदवार निलेश लंके, शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे, आम आदमी पार्टीचे भरत खाकाळ, युवा सेनेचे विक्रम राठोड, माजी महापौर भगवान फुलसौंदर, अशोकराव बाबर, संजय शेंडगे, नलिनी गायकवाड, आशा निंबाळकर, संजय झिंजे, गणेश कवडे, बाळासाहेब बोराटे, दत्ता जाधव, सुरेश तिवारी, गिरीष जाधव आदिंसह महाविकास आघाडीचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी शहर प्रमुख संभाजी कदम म्हणाले,



महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचारफेरीस नगर शहरातील जनतेचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे, यावर त्यांच्या लोकप्रियतेची प्रचिती येत आहे. नगर शहरातून त्यांच्या विजयासाठी शिवसेना प्रयत्नशील असून, जास्तीत जास्त मताधिक्य हे नगर शहरातून मिळवून दिले जाईल. नगरच्या विकासासाठी निलेश लंके हे खासदार होणे गरजेचे आहे. त्यामुळे नगरकरांनी त्यांना उत्स्फुर्त मतदान करावे, असे आवाहन केले.
यावेळी अभिषेक कळमकर म्हणाले, नगरमध्ये आज अनेक प्रश्न प्रलंबित आहेत, सध्याच्या खासदाराने काहीही कामे केले नसल्याने आपणास काम करणारा खासदार दिल्लीला पाठवाचा आहे. निलेश लंके यांनी आपल्या आमदारकिच्या काळात पारनेरमध्ये जी विकास कामे केली, त्याच पद्धतीने संपूर्ण लोकसभा मतदारसंघामध्येही विकास कामे करणारा खासदार झाला पाहिजे, यासाठी निलेश लंके हेच योग्य उमेदवार आहेत, असे सांगितले.
यावेळी किरण काळे म्हणाले, लोकप्रतिनिधी कसा असावा, हे निलेश लंके यांनी दाखवून दिले आहे. त्यामुळे खासदार म्हणून त्यांना लोकांनी स्विकारले आहे, त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत जनता त्यांच्या पाठिमागे उभी असून, त्यांच्या प्रचार फेरीस मिळत असलेल्या प्रतिसादातून दिसून येत आहे. निलेश लंके यांच्या विजयासाठी महाविकास आघाडीचे सर्वच पक्ष सरसावले आहेत. निलेश लंके यांच्या विजयात काँग्रेसचा मोठा वाटा असेल, असे सांगितले. या प्रचार रॅलीचा शुभारंभ दिल्लीगेट येथून सुरु होऊन ही रॅली प्रभाग क्र.८ ते १३ मधील कल्याण रोड, आदर्शनगर, वारुळाचा मारुती, बालिकाश्रम रोड, तोफखाना, बागडपट्टी, सर्जेपुरा, तेलिखुंट, चितळे रोड, नेता सुभाष चौक, चौपाटी कारंजा, नालेगांव, गाडगिळ पटांगण, पटवर्धन चौक, लक्ष्मी कारंजा, नवीपेठ, कापड बाजार, गंजबाजार, दाळमंडई, मंगल गेट, झेंडीगेट, हातमपुरा, रामचंद्र खुंट, बुरुडगल्ली, माणिकचौक, पंचपीर यावडी, कौठीची तालिम मार्गे माळीवाडा येथील ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात सकाळाचा सत्राचा समारोप झाला. प्रचार फेरी दरम्यान नवीपेठ येथील पुरातन श्रीराम मंदिरात प्रभु श्रीरामाचे लंके यांनी दर्शन घेतले.




# दंत व सामान्य आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त महोत्सवानिमित्त क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय शिरवळ येथे मंगळवार दि.१६/०४/२०२४ रोजी मोफत दंत व सामान्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.मिलीद मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या शिबिरात भोसले डेन्टल क्लिनिक चे संचालक डॉ.स्वप्निल भोसले यांनी दातांची काळजी या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन करुन तपासणी केली.डॉ.मृणाल भोसले-कांबळे यानी स्त्री रोग,त्वचारोग सामान्य आरोग्य तपासणी केली.तसेच मेडिप्लस मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल शिरवळ चे संचालक डॉ.मगेश शेणकर यांनी रक्तदाब, साखरेचे प्रमाण, ईसीजी द्वारे विद्यार्थी व कर्मचार्यांची आरोग्य तपासणी व उपचार करून आहार व आरोग्य विषयक मूलभूत मार्गदर्शन केले.या आरोग्य शिबिरात १५० च्या आसपास विद्यार्थी व कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.मुकुंद आमले होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जयंती महोत्सव समिती चेअरमन डॉ.कविता खिल्लारे,आरोग्य तपासणी शिबिर समिती चेअरमन डॉ.विश्वास साळुंखे,सहा.सचालक विद्यार्थी कल्याण मंडळ डॉ.अजित माळी उपस्थित होते.शिबिर यशस्वी होण्यासाठी डॉ.साईनाथ भोकरे, डॉ.उमा तुमडाम, डॉ.गायत्री वानखेडे आरोग्य समितीचे सचिव श्री.सचिन चौधरी श्री.नितीन कदम श्री.सदिप जानकर व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# भारतीय जनता पार्टी धुळे लोकसभा मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे लोकार्पण

## रामनवमीला लोकसभेचा विजयी ध्वज घेतला हाती

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राम नवमीच्या शुभ मुहूर्तावर महायुती उमेदवार डॉ. सुभाष भामरे यांच्या धुळे लोकसभा मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे माजी अध्यक्ष व विधानसभा प्रमुख अनुप अग्रवाल यांनी प्रसार माध्यमांना सांगितले कि येणाऱ्या निवडणुकीत याच कार्यालयातून मोठ्या प्रचाराची सुरवात होणार आहे आणि आज राम नवमी च्या दिवसापासून विजयाचे पर्चम सोबत घेऊन सुरवात करत आहोत आणि डॉ सुभाष भामरे यांना पुन्हा लोकसभेत पाठवू असे सांगितले. ह्या ठिकाणी माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्या शुभ हस्ते रिबीन कापून उद्घाटन करण्यात आले मा. अनुप अग्रवाल, डॉ. सुभाष भामरे, जिल्हाध्यक्ष गजेंद्र अपळकर ह्यांनी नारळ फोडून घोषणा देण्यात आल्या. ह्या ठिकाणी डॉ. सुभाष भामरे, जिल्हाध्यक्ष गजेंद्र अप्पळकर, माजी अध्यक्ष अनुप अग्रवाल,माजी आमदार राजवर्धन कदंबाडे, मनोज मोरे,शशी वाघ, बंटी सोनवणे, आकाश परदेशीं, कैलास चौधरी, प्रतिभा चौधरी, सुमित पवार,प्रदीप करपे, हिरामण गवळी व महायुतीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.




# भारताच्या गौरवशाली इतिहासातील सुवर्ण युगाचे निर्माते सम्राट अशोक : डॉ. प्रेम हनवते



आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** तथागताच्या मानवतावादी विचाराचे पुनर्जागरण करून अखंड भारतासह संपूर्ण आशिया खंडात बौद्ध धम्म रुजविणारे सम्राट अशोक यांचे कार्य महान आहे . पाश्चिमात्य विद्वान त्यांना लाईट ऑफ एशिया म्हणून गौरवतात.जोसेफ प्रिन्सेप यांनी सम्राट अशोकांच्या शिलालेखांचे वाचन केले तर अलेक्झांडर कनिघहॅम यांनी भारत भूमीत उत्खनन करून अशोकाचे शिलालेख ,अशोकस्तंभ, स्तूप, विहारे तसेच पाटलीपुत्र शहर इत्यादी चा शोध लावला. या कालखंडात देशाची सामाजिक सांस्कृतिक आर्थिक क्षेत्रात खूप भरभराट झाली. मौर्य साम्राज्याचा कालखंड म्हणजे भारताच्या गौरवशाली इतिहासातील सुवर्णयुग होते तर या सुवर्णयुगाचे निर्माते मार्य राजघरण्यातील सर्वात कर्तबगार ठरलेले सम्राट अशोक आहेत असे प्रतिपादन इतिहास संशोधक आणि बार्टीतील संशोधन विभागाचे प्रकल्प व्यवस्थापक डॉ.प्रेम हनवते यांनी याप्रसंगी बोलतांना व्यक्त केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीचे विभाग प्रमुख डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी दिलेल्या निर्देशनुसार दिनांक १६ एप्रिल २०२४ Jरोजी बार्टी मुख्यालय, पुणे येथे चक्रवर्ती सम्राट अशोक राजा यांच्या २३२८ व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.या प्रसंगी मुख्य अतिथी म्हणून लाभलेले विभागप्रमुख अनिल कारंडे, लेखाधिकारी श्रीमती योगिता झानपुरे, आणि मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सम्राट अशोक यांच्या जयंती निमित्त मनोगत व्यक्त करताना विभागप्रमुख कारंडे म्हणाले की तथागताच्या बुद्धाच्या धम्माला या देशात पुन्हा पुनर्जीवित करण्याचे महान कार्य सम्राट अशोकाने केले . सम्राट अशोक राजाने राजस्थानमध्ये जाऊन विपश्यना केली . तसेच त्यांनी धम्माचा अभ्यास केला. तोच धम्म त्यांनी देशात व संपूर्ण जगात वाढवला राजवाड्यापासून ते झोपडी पर्यंतच्या लोकांपर्यंत धम्माचा प्रचार केला. सम्राट अशोकांचा आदर्श आपण समोर ठेवून कार्य करावे असे मत त्यांनी व्यक्त केले. सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक डॉ.अंकुश गायकवाड, नरेश गोटे यांनी सम्राट अशोक यांच्या गौरवशाली कार्याला उजाळा दिला. सत्यशोधक चित्रपटाचे सहाय्यक दिग्दर्शक प्रवीण घरडे , बार्टीतील अधिकारी नरेश गोटे यांचे सुपुत्र शतायु गोटे हे गॉबलीन युनिव्हर्सिटी पॅरिस, फ्रान्स येथे उच्च शिक्षण घेत असून त्यांनी आज बार्टी संस्थेत भेट दिली त्यांचे विभाग प्रमुख श्री कारंडे यांच्या हस्ते जातिव्यवस्थेचे निर्मूलन हे पुस्तक भेट देऊन सन्मानित करण्यात आले.प्रस्ताविक करताना प्रकाशन विभागाचे रामदास लोखंडे यांनी सम्राट अशोक यांनी लोककल्याणकारी कार्य केले तसेच त्यांनी कलिंग युद्धानंतर धम्माचा स्वीकार केला धम्माचा जगभर प्रचार आणि प्रसार केला.चक्रवर्ती सम्राट अशोक यांची जयंती शासनाच्या वतीने साजरी होण्यासाठी बार्टीच्या वतीने प्रयत्न करूया असे सांगून शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी बार्टीतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित हो

# रामनामाच्या गजरात प्रचाराची सांगता

आधुनिक केसरी




शाम हेडाऊ

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 ही सात टप्प्यात होणार असून यातील पहिल्या टप्प्यात असलेली चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निर्वाचन क्षेत्राच्या प्रचाराची सांगता ही रामनामाच्या जयघोषामध्ये झालेली आहे . येत्या 19 एप्रिल रोजी लोकसभेच्या पहिल्या टप्प्यातील मतदान होत असून बुधवार दि. १७ एप्रिल रोजी रामनवमी असल्यामुळे यावर्षीच्या निवडणूक प्रचाराची सांगता रामनामाच्या जयघोषातच झालेली आहे.

निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर काँग्रेस आणि भाजपा अशा दोन महत्त्वाच्या पक्षांनी आपल्या प्रचाराला सुरुवात केली. तर उशिरा का होईना परंतु वंचित आघाडीचे उमेदवार राजेश बेले हेही रिंगणात उतरले होते. महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस यांच्या सोबतच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही प्रचार सभा घेत प्रचारांमध्ये चांगलीच आघाडी घेतलेली होती . तर काँग्रेसच्या उमेदवार प्रतिभा धानोरकर यांना उशिरा तिकीट घोषित झाल्यामुळे प्रचाराला फार कमी वेळ मिळाला . शिवाय कोणतेही स्टार प्रचारक त्यांच्या प्रचारासाठी या ठिकाणी आले नाहीत. कन्हैया कुमार यांची एकमेव सभा सोडता इतर कुठल्याही बाहेरच्या स्टार प्रचारकांची त्यांना साथ मिळाली नाही. एवढेच नव्हे तर विरोधी पक्षनेते असलेल्या विजय वडेट्टीवार यांनी सुद्धा अगदी शेवटचे दोन दिवस बाकी असताना त्यांच्या सभेत हजेरी लावली होती. वंचित बहुजन आघाडीने प्रकाश आंबेडकर यांची एक मोठी सभा चंद्रपूर मध्ये घेतली आणि गडचांदूरमध्ये सुद्धा त्यांनी सभा घेतली. रोड शो करिता भाजपाचे सुधीर मुनगंटीवार यांनी सुनील शेट्टी , रविना टंडन यांना आपल्या मतदार क्षेत्रात आणत मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला . तर विरोधात महिला उमेदवार असल्याने मुनगंटीवार यांनी भाजपा महिला आघाडीच्या अध्यक्ष चित्रा वाघ यांनाही आपल्या मदतीला घेतले . चित्रा वाघ यांनी सुद्धा चंद्रपूर वणी आर्णी हे लोकसभा क्षेत्र मुनगंटीवार यांच्या प्रचाराच्या निमित्ताने पिंजून काढले. एकूणच निवडणुकीच्या या रणधुमाळी मध्ये रोड शो, बाईक रॅली, भव्य प्रचार सभा यात भाजपा आघाडीवर राहिली. तर काँग्रेस उमेदवार प्रतिभा धानोरकर यांना मात्र एकाकी किल्ला लढवावा लागला. काँग्रेस तर्फे त्यांच्यासोबत सुरुवातीपासून काँग्रेस जिल्हा अध्यक्ष सुभाष धोटे व शहर अध्यक्ष रितेश तिवारी यांची साथ लाभली . ग्रामीण भागामध्ये मात्र प्रतिभा धानोरकर यांनी प्रचारात चांगलीच आघाडी घेतलेली पाहायला मिळाली .

अखेरच्या टप्प्यात मात्र भारतीय जनता पार्टीचे व महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी यंग चांदा ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष तथा चंद्रपूर विधानसभा निर्वाचन क्षेत्राचे आमदार किशोर जोरगेवार यांना सोबत घेत यंग चांदा ब्रिगेडच्या भव्य मेळाव्यामध्ये एका व्यासपीठावर येत आपली उपस्थिती दर्शविली . निवडणूक प्रचाराच्या अगदी शेवटच्या दिवशी आमदार किशोर जोरगेवार व यंग चांदा ब्रिगेडची सुधीर मुनगंटीवार यांना मिळालेली साथ ही निश्चितच या लोकसभा निवडणुकीच्या मतदानावर मोठ्या प्रमाणात प्रभाव टाकेल आणि याचा फायदा सुधीर मुनगंटीवार यांना मिळेल अशी चर्चा आता चंद्रपूर मध्ये रंगायला लागली आहे.

आरोप प्रत्यारोपांच्या फैरी, विकास कामांची यादी, राष्ट्रीय धोरण, देश पातळीवरील समस्या व नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान पदावरून केलेली जनविकासाची कामे, राष्ट्रीय सुरक्षा, राम मंदिर, कलम 370 यासोबतच स्थानिक विकास कामे याचा पाढा भारतीय जनता पार्टीच्या वतीने जनतेसमोर ठेवण्यात आला. तर गेल्या दहा वर्षांमध्ये मोदी सरकार हे कसे निष्क्रिय ठरले हे सांगण्याचं काम काँग्रेस तर्फे प्रतिभा धानोरकर यांनी केलं. दोन्ही पक्षातर्फे आपापल्या वतीने मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न या निवडणुकीदरम्यान करण्यात आला . भजपा विरुद्ध काँग्रेस अशी थेट लढत असलेल्या या चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निर्वाचन क्षेत्रात येत्या 19 एप्रिलला मतदान होणार असून याचा निकाल 4 जून रोजी लागणार आहे आणि तेव्हाच कोणाचा किती प्रभाव मतदारांवर पडला व मतदारांनी कोणाला आपलं मत दिलं याच उत्तर 4 जून लाच कळणार आहे. आता उरलेल्या दोन दिवसात प्रत्यक्ष भेटीगाठीवर जोर राहणार असून त्यानंतर मतदारांना प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन आपलं मत टाकायचं आहे.

**राष्ट्रीय कार्य म्हणून प्रत्येकाने मतदान करावे :** भारत हा लोकशाही प्रधान देश असून या लोकशाही प्रधान देशांमध्ये मतदार हा राजा असतो . आणि आपण दिलेल्या मतावरच या देशाचं सरकार निर्माण होत असतं , तयार होत असतं . त्यामुळे सर्व नागरिकांनी , ज्यांना ज्यांना मतदानाचा अधिकार आहे अशा प्रत्येकाने आपलही राष्ट्रीय कार्यात मोलाचे योगदान द्यावं यास्तव आपणही मतदान केंद्रावर जाऊन मतदान अवश्य करावे . आणि शत – प्रतिशत मतदान करत या लोकशाहीला मजबूत करण्यामध्ये आपलं योगदान द्यावं . शिवाय सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे नव मतदार म्हणून ज्यांना मतदानाचा अधिकार मिळालाय असे सर्व नव मतदार आणि अठरा वर्षाच्या वर असलेले युवा तरुण मित्र–मैत्रिणींनो तुम्ही सुद्धा मतदान केंद्रावर जाऊन स्वत : मतदान करा . आणि आपण ज्या ज्या क्षेत्रात राहता त्या त्या क्षेत्रातील प्रत्येक नागरिकाला मतदान करण्यासाठी मदत करा आणि त्यांच्याकडूनही मतदान करवून घ्या हेच आपलं आपल्या राष्ट्रीय कार्यात केलेलं मोलाचे योगदान ठरणार आहे .



# माहिती तंत्रज्ञान काळाची गरज

## माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**अजय नजन**

**भातकुडगाव :** जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगावने संचलित भातकुडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय भातकुडगाव येथील सेवानिवृत्त कर्मचारी पाराजी नजन यांचा सेवापूर्ती सोहळा आमदार चंद्रशेखर घुले पाटील सभापती डॉ.क्षितिज घुले पाटील शिक्षक नेते प्राध्यापक भाऊसाहेब कचरे सर विविध मान्यवरांचे उपस्थितीत पार पडला.माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील बोलताना म्हणाले की विद्यालयातील सेवानिवृत्त होत असलेले कर्मचारी पाराजी नजन हे एकनिष्ठ कार्यकर्ते तसेच एक जबाबदार कर्मचारी म्हणून त्यांचं काम आहे. मला त्यांचं कायम सहकार्य लाभलं आहे तसेच यापुढेही लाभणार आहे. आज जगभरात माहिती व तंत्रज्ञानाचे युग असून भविष्यात या संदर्भात आपण उपाययोजना करणार आहोत.

डॉ क्षितिज घुले पाटील बोलताना पुढे म्हणाले की आमच्या शैक्षणिक संस्थेमधील कर्मचारी हा कर्मचारी नसून तर तो कर्मचारी आमच्या कुटुंबातील सदस्य आहे या भावनेतून आम्ही कर्मचाऱ्यांना वागणूक देतो आणि हेच संस्कार हीच शिकवण स्वर्गीय मारुतरावजी घुले पाटील यांनी आम्हाला शिकवलेली आहे. सेवानिवृत्त होत असलेले विद्यालयातील कर्मचारी पाराजी नजन हे बोलताना म्हणाले की घुले कुटुंबांमुळे माझा प्रपंच उभा राहिला तसेच घुले कुटुंबाचे फार मोठे उपकार माझ्यावरती आहे आज जो कोणी मी आहे त्याचे सर्वस्वी श्रेय स्वर्गीय मारुतरावजी घुले पाटील व घुले बंधूंना जात आहे. १९८९ दरम्यान मी या विद्यालयात हजर झालो व तेव्हापासून आजतागायत प्रामाणिकपणे काम करत आहे.पहिल्या पगाराच्या पैशांमध्ये स्वर्गीय मारुतरावजी घुले पाटील यांना मी पेढे घेऊन गेलो त्यावेळी त्यांनी माझी आपुलकीने चौकशी केली. यावेळी माध्यमिक शिक्षक सोसायटीची माजी चेअरमन भाऊसाहेब कचरे यांनी देखील मनोगत व्यक्त केले.जनता शिक्षण प्रसारक मंडळ चे प्रशासकीय अधिकारी के वाय नजन शेवगाव मार्केट कमिटीचे उपसभापती गणेश खंबरे अशोक मेरड प्रदीप काळे संजय पाऊलबुद्धे बबनराव भुसारी सुधाकर भिसे शांतीलाल ओहोळ संदीप भुसारी किशोर बनसुडे जगन्नाथ गावडे विनायक नजन रोहन साबळे कृष्णा सातपुते बाबूलाल पटेल अर्जुन शिंदे प्राथमिक शिक्षक बँकेचे संचालक बाळासाहेब सरोदे संचालक काकासाहेब घुले संचालक सत्यवान थोरे व आजी माजी मुख्याध्यापक उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य प्रा.शाहूराव घुटे यांनी केले वाढता शैक्षणिक आलेख व गुणवंत विद्यार्थ्यांच्या बाबत माहिती मान्यवरांना व ग्रामस्थांना दिली. यावेळी भातकुडगाव ग्रामपंचायत चे सरपंच उपसरपंच व सर्व सदस्य भातकुडगाव सोसायटीचे चेअरमन व्हायचेअरमन व सर्व संचालक मंडळ तसेच ग्रामस्थ व युवक व विद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते. विद्यालयातील शिक्षक प्रदीप ताके सर प्रा.कल्याण जगदाळे यांनी भाषणे केली. तर सुत्रसंचालन नंदकुमार शेळके व प्रा.कल्याण जगदाळे यांनी केले तर आभार भास्कर शिंदे सर यांनी मानले.

# भोयगाव गावातील पहिल्यांदाच असंख्य युवकांनी शिवसेना युवासेनेत केला पक्ष प्रवेश

## पक्षाची वाढती लोकप्रियता पाहून विरोधकांचे धाबे दणाणले

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे, युवासेना प्रमुख आमदारआदित्य साहेब ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवत चंद्रपूर शिवसेना जिल्हाप्रमुख संदीपभाऊ गिऱ्हे व युवासेना जिल्हाप्रमुख श्री विक्रांतभाऊ सहारे याचं कार्य करण्याची शैली बघता पक्ष प्रवेश केला चंद्रपूर युवासेना उपजिल्हाप्रमुख हेमराज भाऊ बावणे यांच्या मार्गदर्शनात व युवा सेना उपतालुकाप्रमुख अमित पिंपळकर यांच्या नेतृत्वात भोयगाव या गावातील असंख्य युवकांनी पक्षप्रवेश केला युवकांचा पक्षप्रवेश हीच आमची संपत्ती असा संदेश युवकांना दिला.

गौरगरिबाचे काम करा, पक्षवाढी साठी काम करा आणि अन्याय होत असेल तिथं लाथ मारा असा संदेश युवा सेना उपजिल्हाप्रमुख हेमराज भाऊ बावणे यांनी दिला. पक्ष प्रवेश करणारे - आकाश भोयर, सौरव घटे, दीपक जुनघरे, रवींद्र मते, अतुल आत्राम, अनिकेत कोडापे, सुरज कोडापे, कुणाल जुनघरे, राकेश पिंपळकर, करण आत्राम ,आशिष आत्राम ,समीर पिंपळशेंडे,कार्तिक पारखी, गौरव वनकर, सारंग ताजने व असंख्य युवक व युवा सैनिक शिवसैनिक उपस्थित होते.



# निळ्या झेंड्याची विटंबना केल्याने फुलंब्री ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील धामणगाव येथे काही जातीवादी मानसिकतेच्या लोकांनी वीस वर्षापासून अस्मिता असलेल्या निळ्या झेंड्यांची विटंबना करून जातीय द्वेष यातून कुठलाही कारण नसताना निळा झेंडा काढून टाकला आहे. यावेळी धामणगाव येथील समाज बांधव व तालुक्यातील समाज बांधव संबंधित जातीवादी लोकांवर आमच्या धार्मिक भावना दुखावल्याबद्दल आरोपीवर आरोपीत लोकांवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी पंकज कैलास वाहुळ धामणगाव यांनी फुलंब्री पोलीस स्टेशनमध्ये केली असून यावेळी विनोद कसारे, आकाश सुभाष गंगावने व इतर समाज बांधव उपस्थित होते.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in





# चैत्रसप्तमीनिमित्त मर्दनगड किल्ल्यावर एकविरा शिवभक्तांचा महापूर

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यातील आवरे येथील मर्दनगड किल्ल्यावर सह्याद्री प्रतिष्ठान व मर्दनगड संवर्धन समिती आवरे तर्फे बांधण्यात आलेल्या एकविरा देवी मंदिरात चैत्र सप्तमी निमित्ताने एकविरा माता उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. उत्सवाच्या निमित्ताने आयोजक मर्दनगड संवर्धन समिती संस्थापक कौशिक ठाकुर , सरपंच निराताई पाटील,सामाजिक कार्यकर्ते राजू मुंबईकर, प्रभाकर म्हात्रे,महेश गांवड, गणेशप्रसाद गांवड , संदीप गांवड ,विद्याधर गांवड , गाव अध्यक्ष संजय गांवड ,ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील,अरुण गांवड, बाळकृष्ण गांवड कृष्णा पाटील , गड संवर्धक प्रशांत भोईर या मान्यवरांच्या उपस्थितीत अभिषेक,होम ,गडपूजन, व पालखी सोहळा अश्या अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.आवरे गावातील व पंचक्रोशीतील एकविरा शिवभक्तांनी सकाळ पासून उपस्थिती दाखवून आई माऊलीचा उदो उदोच्या जय घोषात दर्शन घेतले. ग्रामस्थ आवरे ,एकविरा बिटस चे आशुतोष म्हात्रे,सोमवार आरती, मंडळ, खासरी पाडा महिला मंडळ यांनी मोलाचे सहकार्य केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शंकर पाटील,दिपेश ठाकूर, दिलेश ठाकूर, विनोद ठाकूर, हितेंद्र म्हात्रे,तुषार म्हात्रे,संजय गावंड,धिरज ठाकूर, संतोष म्हात्रे यांनी मेहनत घेतली.

# लोकसभा निवडणुकीसाठी जालना प्रशासन सज्ज

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** लोकसभा मतदारसंघासाठी चौथ्या टप्प्यात



दि. 13 मे रोजी मतदान होणार आहे. यासाठी प्रक्रिया गुरूवार, दि. 18 एप्रिलपासून सुरू होत आहे. निवडणूक प्रक्रियेसाठी जिल्हा प्रशासन सज्ज असून नामांकन अर्ज दाखल करणे ते मतमोजणीसाठी आवश्यक ती तयारी पूर्ण करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

लोकसभा निवडणुकीची अधिसूचना दि. 18 एप्रिल रोजी प्रसिद्ध होणार आहे. इच्छुकांना दि. 25 एप्रिलपर्यंत सकाळी 11 ते दुपारी 3 वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी नामांकन अर्ज सादर करता येणार आहे. दाखल करण्यात आलेल्या नामनिर्देशन पत्रांची दि. 26 एप्रिल रोजी छाननी करण्यात येणार आहे. तसेच दि. 29 एप्रिल उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. दि. 13 मे रोजी मतदान होणार असून दि. 4 जून रोजी मतमोजणी होणार आहे. इच्छुकांना ऑफलाईनसह सुविधा संकेतस्थळावरून ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची सुविधा मिळणार आहे. ऑफलाईन अर्ज करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात व्यवस्था करण्यात आली आहे. याठिकाणी कोरे अर्ज मिळणे, अनामत रक्कम स्वीकारणे, नामांकन अर्ज स्विकारणे आदींची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे.

तसेच निवडणूक कर्तव्यावर असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी मतदानाची सोय करण्यात आली आहे. निवडणूक निर्भय आणि न्याय वातावरणात होण्यासाठी भरारी पथकांची निर्मिती करण्यात आली आहे.

# मुलांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहारी ज्ञानही शिकवणार : यशश्री पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** आमच्याकडे मुलांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहारी ज्ञानही शिकवली जाईल, सर्व गुण संपन्न सुजाण नागरीक घडवणे हा श्रीम एज्युकेशनचा उद्देश आहे त्यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्नशील आहोत असे प्रतिपादन क्लासच्या संस्थापक अध्यक्षा डॉ .यशश्री पाटील यांनी केले. या क्लासमध्ये संस्कारा बरोबरच मानसिक आरोग्य चाचणी, व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम , विद्यार्थी व पालकांसाठी राबविण्यात येईल, तसेच वैयक्तिक कौन्सलिंग व मार्गदर्शक, स्पोकन इंग्लिश कोर्स, डिजिटल एज्युकेशन आदींचा समावेश असलेला अनेक कोर्स मुलांना वर्षभर शिकता येतील असे डॉक्टर पाटील यांनी यावेळी सांगितले. येथील श्रीम एज्युकेशन ग्रुप आयोजित स्कॉलरशिप परीक्षेत कुमारी अमृता गणेश खाडे ही विद्यार्थिनी 84 गुण मिळून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली ,तर मुलांमध्ये अनिकेत मल्हारी कदम हा 83 गुण मिळवून मुलांमध्ये पहिला आला. या परीक्षेत मुलींमध्ये कु. प्रेरणा पीटर पाटोळे 80 द्वितीय व कुमारी प्रियंका राम भगत 79 तृतीय या अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या आल्या तर मुलांमध्ये रोहन सहदेव अडसूळ ( 82 ) श्रेयश शशिकांत शिंदे ( 80 )यांनी पहिले तीन क्रमांक पटकावले.

श्री एज्युकेशन ग्रुपच्या या पहिल्या स्कॉलरशिपला मुलांनी भरभरून प्रतिसाद दिला. या परीक्षेचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच पार पडला कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे मानसोपचार तज्ञ डॉ. श्रीकांत कुलांगे हे होते.

परीक्षेचे व्यवस्थापन बाजीराव खांदवे व चंद्रकांत दरंदले यांनी केले होते. यावेळी ठुबे सर, सावंत मॅडम विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# श्रीराम साधना आश्रमामध्ये पुष्पवृष्टी करून प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तालुक्यातील मुकिंदपूर चारी क्रमांक तीन जवळ असलेल्या श्रीराम साधना आश्रमामध्ये रामनवमी निमित्ताने आश्रमाचे प्रमुख महंत सुनीलगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व संत महंतांसह हजारो भाविकांच्या उपस्थितीत पुष्पवृष्टी करून प्रभू श्री रामचंद्रांचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. राम नामाच्या जयघोषाने येथील वातावरण राममय बनले होते.

प्रभू श्री रामचंद्र भगवंताच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने महंत परमहंस मुक्तानंद महाराज वेल्हाळे संगमनेर यांचे किर्तन झाले.यावेळी बोलताना ते म्हणाले की जीवनात संतांची संगतीने केलेला परमार्थ फलद्रुप होत असतो तो परमार्थ आपणास प्राप्त व्हावा म्हणून महंत सुनीलगिरीजी बाबांनी श्रीराम साधना आश्रमाची येथे स्थापना करून आपल्या सर्वांना भक्ती मार्गाला लावले. आज येथे भव्य दिव्य कार्यक्रम झाले भक्तांना भगवंताचा येथे सहवास मिळत असल्याने हे क्षेत्र वैभवाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचा संदेश देत त्यांनी श्रीरामनवमीच्या उपस्थित राम भक्तांना शुभेच्छा दिल्या.



यावेळी झालेल्या श्रीराम जन्मोत्सव सोहळयाच्या प्रसंगी श्रीराम साधना आश्रमाचे महंत स्वामी सुनीलगिरीजी महाराज, महंत परमहंस मुक्तानंद महाराज वेल्हाळे, खंडेश्वरी देवस्थानचे महंत श्री गणेशानंदगिरीजी महाराज,संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, साध्वी सुवर्णानंद चैतन्य, संकेत महाराज पुरी, लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, साहेबराव महाराज चावरे, बदाम महाराज पठाडे, केरळ येथील भक्त शेखर भैय्या, संतसेवक शिवभक्त विष्णूबाबा नाबदे, पी. आर. जाधव, भिवाजीराव आघाव,अशोक निपुंगे, दत्तात्रय कांगुणे, अमितराजे शिर्के, होमगार्ड समादेशक पत्रकार बाळासाहेब देवखिळे, पत्रकार सुधीर चव्हाण, पत्रकार संदीप गाडेकर, पत्रकार शंकरराव नाबदे, बाळासाहेब झावरे यांच्या हस्ते सामूहिक आरती करण्यात आली. सेवेकरी सौ. सीमंतीनी बोरुडे व सौ. जयमाला जाधव यांनी श्रीराम जन्माचा पाळणा म्हटला.

यावेळी झालेल्या जन्मोत्सव प्रसंगी पांडुरंग अभंग, साध्वी सुवर्णानंद चैतन्य, महंत सुनीलगिरी महाराजांच्या हस्ते पाळण्यातील रामल्लाच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. पाळण्याची दोरी ओढून प्रभू रामचंद्रांचा जन्मोत्सव पुष्पवृष्टी करून साजरा करण्यात आला. यावेळी "सियावर रामचंद्र की जय"जय श्रीराम"असा जयघोष यावेळी करण्यात आला. यावेळी श्रीराम जन्मोत्सव सोहळयात योगदान देणाऱ्या देणगीदार तसेच दात्यांचा यावेळी स्वामी सुनीलगिरीजी महाराज यांच्या हस्ते श्रीफळ प्रसाद देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित भाविकांना शाबुदाना खिचडीचे वाटप प्रसादाच्या रूपाने करण्यात आले. रामनवमी निमित्ताने श्रीराम मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. भगव्या झेंड्यांनी व उभारण्यात आलेल्या शामियान्यामुळे मंदिर परिसर मंगलमय बनला होता. दिवसभर भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. मंदिर परिसरात केलेली भव्य रोषणाई भाविकांचे आकर्षण ठरली होती. मंदिर प्रांगणात विविध दुकानांचे स्टॉल थाटण्यात आल्याने परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर